
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २७७६



REFBK-0022774

# तिळफुले

विद्याधर भागवत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्रु. मा. प.)

निबंध
२७७६
२२७७४
८।१२।७९
संदर्भ शाखा

# तिळफुले

विद्याधर भागवत

REFBK-0022774

अभिनव
प्रकाशन

प्रकाशक :
वामन विष्णु भट,
**अभिनव प्रकाशन,**
५३ गुरु नानक मार्केट, डॉ. आंबेडकर रोड,
दादर, मुंबई १४

सर्व हक्क सौ. उषा भागवत

प्रथमावृत्ती : ऑगस्ट १९७९

मुखपृष्ठ : विश्वनाथ घैसास

**किंमत : सात रुपये**

मुद्रक :
प्रभाकर ह. पाटील,
**संतोष मुद्रणालय,**
अलिबाग

२७७६
३२७७४
निबंध

कविवर्य कुसुमाग्रज

(श्री. वि. वा. शिरवाडकर)

यांस–

## दोन शब्द

चालू दशकाडीपूर्वी लिहिलेल्या व नियतकालिकांतू प्रकाशित झालेल्या ललित लेखांचा हा छोटेखानी संग्रह केवळ श्री. **वामनराव भट** यांच्या कृपेमुळे प्रकाशित होत आहे.

गेल्या दशकात ललित निबंधाचा तोंडावळा फारसा बदललेला नाही. त्यामुळे जुनेपणाचा शिक्का बसण्याची भीती नाही व नवेपणाची फुशारकी मारण्याचे कारण नाही. कारण ललित निबंधात जुने-नवेपणाचा प्रश्नच उद्भवत नाही. प्रश्न उद्भवतो तो त्यातील लालित्याचा. त्याचा शोध घेण्याचे काम वाचकांवर. म्हणजे मी दोन्ही बाजूनी मोकळाच.

सदरचे निबंध पूर्वी ज्यातून प्रसिध्द झाले त्यांच्या संपादकांचे -महाराष्ट्र टाईम्स, मनोहर (पूर्वीचा), वाङ्मय शोभा, माणूस, वैनतेय, व्याध, केसरी वगैरे नियतकालिकांचा यात समावेश आहे- आभार. आणि प्रकाशात आलेल्या लेखांना सुबक पुस्तकाचा आकार दिला त्या श्री. वामनराव भटांचे ऋण सदैव बाळगण्यात एक वेगळेच समाधान. त्यांनी माझ्याकडून हक्काने लिहवून घ्यावे!

कुडासे, ना. सावंतवाडी
जि. रत्नागिरी.

-**विद्याधर भागवत**

---

## अनुक्रमणिका


| लेखानुक्रम | पृष्ठ |
|---|---|
| १ : तिळफुले | ५ ते ८ |
| २ : कलावंताचे मन | ९ ते १३ |
| ३ : पिंपळ | १४ ते १८ |
| ४ : कातर वेळ. | १९ ते २३ |
| ५ : चिकणं | २४ ते ३० |
| ६ : वेगळं विश्व | ३१ ते ३६ |
| ७ : मळलेली वाट | ३७ ते ४३ |
| ८ : एक इंद्रियातीत रात्र | ४४ ते ४८ |
| ९ : झुलता पूल | ४९ ते ५३ |
| १० : तंद्रीत असलेलं गाव | ५४ ते ५८ |
| ११ : चिंधीचे गाणे | ५९ ते ६३ |
| १२ : गाईमागून धावणारं पोर | ६४ ते ६७ |

# १ : तिळफुले

अधिऱ्या ढगांनी आपल्या पापण्या उघडलेल्या असतात, तेव्हा धरती-वर सर्व काहीं सुरळीतपणानं पार पडलेलं असतं. भाद्रपदातील पोटाशी धरतीच्या गर्भाचा पहिला पिवळा हुंकार येऊ लागला की, वारा ढगांच्या पापण्यांना हळूच सांगतो, " हं ! आता उघडा डोळे !"

मग हिरव्या कंच पानांतून सोनसळी उन्हाखाली झिरपते आणि आश्विनाचा पहिला जन्मोत्सव सुरू होतो. लचकतमुरडत जाणारी एखादी नखरेल वाट एक गिरकी घेऊन हळूच थांबून कानोसा घेते. आपल्या मनांतील खळबळ संयमानं थांबवून धरून डोह मिस्किलपणानं कान देतो. डोंगराच्या फटींतून एखादा खडक डोकावतो. आपले वाकडे दात दाखवीत पोटाशी केळ उद्गारते, " अग्गो ऽ बाई ! होक्का ?"

हळूहळू साऱ्या माळावर ही बातमी पसरू लागते. दिव्यावर दिवा लावून पुढं जावं तसा वारा फुलांचे ताटवे फुलवत जातो. आणि मग साऱ्या धरती-वर हास्याची पिवळी लकेर उमटते.

तिळफुलं संपूर्ण फुललेली असतात, सोनझरे सळसळत असतात, पाना-पानांचा उत्सव सुरू होतो.

गंपू गुरव आपला पंचा खोवीत परडी घेऊन तिळफुलांतून अलगद जातो.

परडी भरून फुलं खुडतो. या फुलांना वास नाही. असतं ते फक्त रूप. वाऱ्यावरचा दोलायमान स्पर्श. टोकदार पाकळ्यांचा सोनेरी वखं.

गंपू गुरवाची परडी भरून जाते. तो सरळ माऊलीच्या देवळाकडे वळतो. बाया गुरवीण त्याच्या माळा गुंफते. कारण नवरात्रीचा उत्सव सुरू झालेला असतो ना ! तांब्याच्या कलशासभोवार नवधान्याचं रुजवण रुजून त्याची पिवळी लुसलुशीत पानं फाकतात. बहरलेल्या माटवीवरून तिळफुलांची माळ त्या कलशावर रुळू लागते. सस्य श्यामला धरतीवरील निळ्या आभाळांत पीळ पडलेली विद्युल्लता दिसावी, तशी. त्या प्रशांत गाभाऱ्यांत नऊ दिवसांत वाढत्या क्रमानं माळा रुळतात.

दुपारच्या नैवेद्यासाठी खमंग वड्यांचा वास दरवळतो. कोकणात नव्याची पूर्णिमा आटोपली की नव्या भाताचे तांदुळ सुरू होतात. त्याच तांदुळाच्या पिठाचे वडे. पूर्वीच्या जुन्या राणीछाप रुपया एवढे. बरोबर वाटाण्याची आमटी आणि गूळखोबरं एकेका पानावर वीसवीस वड्यांचा ढीग घालून गुरव देवीला नैवेद्य दाखवितो. आरती होते. आणि ब्राह्मण कुमारिकेसह सर्व पंगत या वड्यांवर ताव मारते. वड्यांची ही आठवण मग वर्षभर पुरते.

तिळफुलं म्हणजे अश्विनाचं वैभव. पावसाळ्यातील साऱ्या स्मृती उराशी घेऊन अश्विन या तिळफुलात उतरतो. छोटीशी सूर्यफुलंच ही ! दिवसा रात्री कधीही न मिटणारी ही फुलं निसर्गाची तृप्ति होईपर्यंत त्याची सेवा करतात, आणि या साऱ्यांची स्मृती आपल्या उदरात तिळांच्या रूपानं साठवून मावळतात. या तिळफुलांनीं जसं आपलं वैभव फुलवलं आहे तसं निसर्गाचंही. नवरात्रीत देवीच्या चरणी आपलं विनम्र जीवन जसं त्यांनी वाहिलं आहे तसं शृंगारालाही उत्तेजन दिलं आहे.

माळावरील खोपटासमोर उभी राहून इंज्या धनगराची पारु डोळ्यात काजळ रेखून कुणाची तरी वाट पाहात असते. ते या फुलाना दिसतं आहे. परड्यातील भेंडे खुडणं हा केवळ तिचा आवडता छंद आहे. ते भेंडे काढता काढता कुणाला तरी संकेत मिळालेला असतो, हे या फुलांच्या नजरेतून कसं सुटेल ? वेलवाडीच्या बखल्यांचा बंडू हातात पाटी-पुस्तक घेऊन शाळेत

जाण्याचं निमित्त करतो व कुठं दडी मारून बसतो, हे त्या फुलांना विचारा. सरस्वतीच्या पूजनासाठी मखरासभोवार कशा प्रकारची आरास करावी हे यमूला, सुमीला या फुलांनीच सुचविले आहे. त्यामुळे त्यांच्या समोरची एक काळजी किती दूर झाली आहे ! आतां त्यांना मनसोक्तपणानं शाळेतील नृत्यांत भाग घेता येईल. बाईंची करडी नजर त्यांना जाचणार नाही. शाळेच्या सजावटीत मधु देसायाला या फुलांनी खूप मदत केल्यामुळे मधूच्या वार्षिक परीक्षेतील यशाची खात्री जरा दोन पावलं जवळ सरकली आहे.

आणि दसऱ्यासाठी कोण ही धावपळ ! दुपारपासून ढोल वाजताहेत. आपट्यांची पूजा आटोपली आहे. शमीवरची शस्त्रं पुसली गेली आहेत. रवळनाथाच्या देवळासमोर देव उभे राहिले आहेत. देव घेणारे घाडी घुमताहेत. त्यांच्या पुढ्यात अनेकांची भाकितं ठरविलीं जात आहेत. नारळ फुटताहेत. सोनं लुटायला हात शिवशिवत आहेत. नमस्कार चमत्कारासाठी एकमेक खाली वाकताहेत.

श्रीपादरावांनी आपलं जरीकाठी उपरणं आजच काढलं आहे. त्याच्या नवेपणाचा ट्रंकेचा वास अद्याप समोरच्या माणसाच्या नाकात शिरतो आहे. परशुरामपंत पेन्शनर काळी टोपी घालून हातातील रुजवणाच्या पात्यातील काही काड्या देऊन प्रतिनमस्कार स्वीकारताहेत. सोन्यावर चाललेल्या कोट्यांना ढोलाचा ताल उठाव देत आहे. मुलं शिक्षकांना सोनं देतांना त्यांना हळूच काहीतरी डोळ्यांनी सुचवीत आहेत आणि भोगटे मास्तर मिशीतल्या मिशीत हसताहेत.

प्रत्येक दृश्य तिळफुलं डोळ्यात सांठवून ठेवत आहेत ! अचानक वाऱ्याची लहर येते. क्षणभर पापण्या मालवतात. दृश्य बदलून जातं. सकाळी धुक्याच्या मऊ मखमलीत विसावलेल्या त्या पाकळ्या धुकं वितळताच पुन्हा उठून बदलत्या काळाकडे कौतुकानं आणि उत्सुकतेने पाहू लागतात. आकाशाच्या भव्य घड्याळातील वर्षांचे काटे सरकतात. लोकांच्या चालीरीती बदलतात. श्रद्धास्थानं बदलतात. तरी या बदलत्या परिस्थितीतही हीच फुलं मागच्याप्रमाणं रंगून जातात. ती कुणालाही नांव ठेवत नाहीत. कुणाचेही दोष दाखवीत नाहींत. आलेल्याचं स्वागत करणं हेच जणू त्यांचं कार्य.

आज दसरा उजाडला तरी मोरू उठत नाही. काशी त्याला ओवाळत नाही कारण मोरू आपल्या पोटाच्या उद्योगात झिजतो आहे. काशी संसाराचा मोडका गाडा लोटते आहे. आजची काशी पुरुषाबरोबर जीवन सागरात उडी टाकू पाहाते आहे. पोटासाठी नोकरी करते आहे. नोकरीसाठी पोट जाळते आहे. तिचा संसारही मरगळल्यासारखा झाला आहे. ऊब नाही. उत्सुकता नाही. 'दिवाळी दसरा, हातपाय पसरा' म्हणणाऱ्यांचे हातपाय मोकळे नाहीत. उत्सवांकडे पाहण्याची दृष्टी बदलून गेली आहे. निर्जीव डोळ्यांच्या पटलापर्यंत हे तेज पोहोचू शकतच नाही. दसरा नेमेचि येतो–जातो. दिवाळीची कोरडी पावलं नेमानं उमटतात. पुसून जातात.

इंज्या धनगराची पारू सासरी जाऊन नवऱ्याला टाकून परत आली आहे. माऊलीच्या देवळाकडचे नैवेद्याचे वडे नया पैशाएवढे झाले आहेत. भोजनाच्या वेळी कुमारिकेसाठी वाढलेलं अन्न गाईला घालून त्यांत समाधान मानून घेत आहेत. कुणाला हौस आहे ? जणू मागचं वर्ष आपल्याबरोबर जिवंतपणा घेऊनच संपत आहे.

हे सारे बदल तिळफुलांनी पाहिले आहेत. तरीही अश्विन उजाडला की याचं पिवळं स्मित ओसरत नाही. माळावर अवतरलेल्या ढगांच्या शिल्पाची ती अजूनही त्याच भक्तीनं पूजा करतात. अजूनही त्या वाटोळ्या पाकळ्या स्वर्णझऱ्यांच्या तालावर नाचत असतात. यांचं संगीत ओसरलेलं नाही. काळ बदलला तरी आणि देव बदलला तरीही ही फुलं फुलणार आहेत. आपली सोनेरी आठवण निळ्या ढगांच्या कुशीत ठेवून जाणार आहेत. केवळ पुढील वर्षाच्या स्मृति- कोशाचं नवीन पान उघडण्यासाठी !

० ० ०

## २ : कलावंताचे मन

रेडिओवर कालच माझ्या एका कविमित्राचं काव्यवाचन चालू होतं. झंकारलेल्या शब्दांची फुलं बाहेर पडत होती . बाहेरील गार शिरव्यात विरून जात होती. शब्दांशब्दांतून प्रतिमा उमटत होत्या. गोड गोड शिरव्याच्या धुंदीत, चहाच्या गरम गरम घोटाबरोबर काव्यातला एक एक शब्द चघळत आम्ही पांच–सहा मित्रमंडळी एका हॉटेलमध्यें रेडिओ ऐकत बसलो होतो. शब्दाशब्दांचं कंपन लाख लहरी उमटवून जाई. भावविश्वाच्या कक्षा रुंदावत होत्या. प्राजक्ताच्या फुलांचा ढीग श्रावणांतल्या एका सकाळी अंगावरून कोसळावा, तसं कांहीसं मनांत लहरून...फुलून जात होतं तृप्तीनं मन भारून जात होतं. काव्यवाचन संपलं तरी बराच वेळ कुणी कांही बोलत नव्हतं. धुंदी संपली नव्हती. प्रत्येकाला कांहीतरी मिळालं होतं. हवं हवंसं वाटणारं...अस्वस्थतेची मादकता आणणारं...कांहीतरी हरवलेलं सापडलं होतं.

कांही न बोलतांच आम्ही हॉटेलातून बाहेर पडलो. जणू आमच्या तोंडची बडबड म्हणजे त्या सविकल्प समाधीला तडाच जाणार होता. न बोलण्यांतही त्यावेळी सुख वाटत होतं. संपूर्ण रात्रच बेहोषींत कशी गेली ते समजलं नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीच्या कामासाठी मी बाहेर पडलो. काल रात्रीच्या श्रोतृवृन्दापैकी एक लेखक मित्र मला बसमध्ये भेटला. माझ्या

मनांत कालची स्मृती जागी झाली. एखादी चांगली गोष्ट पुन्हां पुन्हां मनात आणली की बरं वाटतं. मी त्या मित्राला विचारलं,

"काल बुवा कविता छान म्हटल्या नाही त्यानं?"

'होय.' थंडपणाने तो उत्तरला.

'शब्दा शब्दांतून भावविश्व फुलविण्याची विलक्षण शक्ती आहे त्यांच्यात!'

'हं!'

'असं काही चांगलं ऐकलं की, त्याच धुंदीत आपले कांही दिवस निघून जातात. तुला नाही वाटत असं?'

मी त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. निर्विकार चेहरा होता त्याचा

'असं काय बोलतोस कोरड कोरडं! तुला आवडल्या नाहीत कविता?'

'आवडल्या की—'

'मग मी एवढं बोलतोय, त्याला तू फक्त होकारच देतोस, म्हणून म्हटलं. तुझ्या त्या नव्या-जुन्यात काही यांतलं बसत नाही वाटतं?' खवचटपणाने मी त्याला विचारलं.

'तसं नव्हे; मला त्या कवीचा फार हेवा वाटतो. मला त्याचं काव्य आवडतं...पण-'

पण इतक्यांत त्याचा स्टॉप आल्यामुळे तो झटकन उतरून खाली गेला. मला विलक्षण आश्चर्य वाटलं. त्याला कुठंतरी खुपत होतं. कसल्यातरी यातना होत होत्या.

संध्याकाळपर्यंत मी तो विषय विसरून गेलो. पण रात्री झोपतांना मात्र त्या विचारांनी पुन्हा डोकं वर काढलं. राहून राहून त्या मित्राचे उद्गार आठवू लागले 'मला त्या कवीचा हेवा वाटतो...' तोही एक लेखक होता. मासिकांच्या बाजारांत त्याला भाव होता. कीर्ती मिळाली होती. वाचकवर्ग भरपूर मिळाला होता. खरं म्हणजे त्याला हेवा वाटण्याचं काहीच कारण नव्हतं. एकदोनदां अनेक कलावंताविषयी तुच्छतेचे उद्गार त्याने काढलेले मी ऐकले होते. त्यांच्या खाजगी जीवनाचे वाभाडे काढले होते. अमुक

अमुक बुवा कम्युनिझमचा प्रचार करतो. तमक्यांत तर कांहीच जोर नाही. तमक्याची तर कांही तरी भानगड आहे...वगैरे गोष्टी त्यानं मला ऐकविल्या होत्या.

मला जे आश्चर्य वाटले ते याचेच– एका कलावंतानं दुसऱ्या कलावंताचा हेवा कां करावा ? त्याला आपल्यापेक्षा तुच्छ कां लेखावं ? कलावंताचं जीवनच वेगळं असतं नव्हे का ?

प्रत्येकाजवळ एकाच मापाची शक्ती असते असं थोडंच आहे ? प्रत्येक कलावंताचं अनुभवविश्व वेगळं असतं. त्याच्या भावविश्वाचं क्षेत्र वेगळं असतं. निसर्गाच्या सान्निध्यांत तो धुंद होतो. पावसाच्या पागोळ्यांशी त्याचं संगीत सुरू असतं. तो चांदण्याच्या तलावांत विहार करतो. श्रावणांतल्या इंद्रधनुष्याच्या फुलोऱ्याच्या हळुवारपणानं त्याचं जीवन फुलतं मऊ परागांच्या हातांनी फुलांचं जीवन तो टिपून घेतो. तरल धुक्याच्या आंतर-मनाचं गूज तो ऐकतो. निरनिराळ्या चिरनूतन प्रतिमा त्याच्या मनात साकार होऊन बेभानपणे धावत असतात. त्या प्रतिमांत तो नवीन रंग भरतो, आपल्या नव्या दृष्टीनं नवीन सृष्टी तो निर्माण करतो. त्याच्या प्रतिभेच्या पंखांची झेप जेवढी मोठी असेल तेवढं विश्व तो त्या पंखात सामावून घेत असतो.

'दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके,' असं जे सर्व प्रतिभावंतांच्या वतीनं कवि ओरडून सांगतो, त्यांत गर्वोक्ती आहे, असं कोण म्हणू शकेल ?

पण असा जो प्रतिभावंत असतो तो कधी खालच्या पायरीवर येऊ शकेल का ? स्वार्थ, हेवेदावे याच्याही पार त्याची दृष्टी असते. या व्यवहारी जगात त्याचं मन रमून जाऊ शकत नाही.

खरा कलावंत हाच खरा रसिक असतो. दुसऱ्याच्या कलेनंही तो आनंदून जातो. त्यांतील नवसौंदर्यापासून तो सुखावतो. त्यासाठीच त्याची धडपड असते. त्याचं मन गटेप्रमाणं असतं; जगज्जेत्या शिकंदराप्रमाण नव्हे !

संपूर्ण विश्वांत विविधता भरली आहे. विविधता हे सृष्टीचं एक महान्

तत्व आहे. एका क्षणापूर्वी पाहिलेलं वस्तू दुसऱ्या क्षणाला तशीच दिसेल याचा काय नेम ? किंबहुना, ती तशीच राहील याचीही कुणी हमी देऊ शकेल का ?

विविधता आहे म्हणूनच त्यांत गोडी आहे, विविधता आहे म्हणूनच त्यांत कला आहे. जे आहे त्याहून कांही तरी वेगळं पहावं असं कलेला वाटत असतं. तिचा आत्मा त्यातूनही सौंदर्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करीत असतो; तरीही तो असंतुष्टच राहतो. आणि समाधान हेच मूळी कलेचं बीज आहे. सृष्टीत जिथे जिथे अपूर्णता दिसेल तिथे ती पूर्णतेचा साज चढविण्याचा प्रयत्न करते. तरीही ती पूर्णता अपूर्णच रहाते. तसं नसतं तर क्षणांत गगनाला उजळून टाकून लुप्त होणाऱ्या विद्युल्लतेत सौंदर्य राहिलं नसतं. पुळणीमध्ये चुराडा होणाऱ्या लहरींवर काव्याची झिलई चढली नसती. झुळझुळणाऱ्या निर्झरात संगीत भिजलं नसतं. चंद्राचं हास्य उमगलं नसतं. धरतीचं मार्दव राहिलं नसतं.

असं कधी घडलं आहे का ? सौंदर्य हे चिरनूतन आहे व ते शोधून काढणारी प्रतिभाही चिरंजीव आहे. हे अनादिकालापासून चालत आलं आहे. शाश्वत सौंदर्याचा मागोवा घेत अनेक प्रतिभावंत आले आहेत. अशा प्रतिभावंतानी एकमेकांचा हेवा करून काय उपयोग?

माझ्या त्या मित्राला त्या कवीचं काव्य ऐकून मत्सराच्या यातना का व्हाव्या तेच मला समजत नाही. मत्सराच्या पोटी तिरस्कार व तिरस्काराच्या पोटी तुच्छता जन्माला येते की काय कोण जाणे! मग एक कलावंत दुसऱ्या कलावताबद्दल तुच्छतेनं बोलतो ते याच भावनेनं की काय ?

मी म्हणतो, तो खरा कलावंतच नव्हे. रसिक तर नव्हेच नव्हे. केळीच्या बनांत शिरून काट्यांची अपेक्षा करणारा तो उंट असतो. मला वाटतं, केळीच्या बनांतही ज्यावेळी त्याला काटेच दिसू लागतात, तेव्हांच त्याच्यांत टीकाकार जन्म घेतो. त्याच्या नजरेतील हिरवेपणा नष्ट होऊन नजरेला गंज चढतो. अशा गंजलेल्या नजरेच्या मनुष्याला मग गुहेत खोदलेल्या व शाश्वत सौंदर्य उराशी जपून ठेवणाऱ्या प्रतिमांवरची धूळच दिसू लागते. तो

शास्त्र धुंडू लागतो, चिकित्सा करूं लागतो. टीकाशास्त्राचा उगम विचारांच्या रुक्ष खडकांतून झाला आहे, भावनांच्या ओल्या झऱ्यांतून नव्हे.

जगांतील सर्व टीकाशास्त्रे नष्ट झाली तर ?.. मला एक शंका येते, टीकेचा जन्म अशा हेव्यांतून ..... मत्सरातूनच होत नसेल ना ? अशा या मत्सरामुळेच सुंदर वस्तूंची पायमल्ली होते. एक दुसऱ्याला तुच्छ लेखतो. त्याची प्रतिभाच एवढी क्षीण झालेली असते की, दुसऱ्याच्या प्रतिभेच्या तेजानं तो दिपून जातो. आपले डोळे मिटून घेतो. प्रकाशांतूनही त्याला अंधारच दिसू लागतो. मग तो चांचपडण्याचा प्रयत्न करतो; पण त्याच्या हातांना नक्षत्राच्या ऐवजी काजवेच लागतात.

माझ्या मित्राची अशी स्थिती नसेल कशावरून ? नाही तर त्यानं माझ्या आनंदात भाग घेतला असता आणि त्याची अधिकाधिक चव घेत तो आनंद द्विगुणीत केला असता. कदाचित् असं असेल, त्याला त्यांत कांही रसच मिळाला नसेल ... मला झालेल्या आनंदापासून त्यालाही आनंदच व्हावा असं तरी कुठं आहे ?

०  ०  ०

## ३ : पिंपळ

अंगणातील मांडवावरच्या चुडतांच्या झरोक्यातून उन्हाचे तिरपे सूर येऊन ओघळू लागले की दिवसांना मन आहे हे पटू लागतं.

माघ, फाल्गुनाचा गुलजारपणा लपेटून दिवस आले की त्यांचे व आपल्या आत्म्याचे संवादीं सूर निघतात. दिवसांना मन आहे तसं शरीरही आहे आणि वयही आहे. दिवस लहान मुलांचे रूप घेऊन आले की ते मुग्ध बनतात.

समोरच्या पिंपळाकडे पाहिले की नेहमी असे होते आपल्यातलेच लहान वयाचे दिवस बोलू लागतात–

या पिंपळाची मुंज झाली होती म्हणे. आजीने की कुणीतरी हे सांगितलेले असते.

आपण त्या वेळी कुतूहलाने ऐकलेले असते. पण आता जेव्हा हे सारे ऐकतो तेव्हा ते मानवी शब्द नसतात, दिवसच आजीचे रूप घेऊन बोलतात.

मुलांचीं मुंज तशी पिंपळाची मुंज. कितीं चमत्कारीक !

० तुझ्या दादांबरोबर तुझ्या दोन काकांच्या मुंजी झाल्या; मग तीन म्हणजे आडीतिडी संख्या, चौथी मुंज पिंपळाची केली. तुझ्या दादांच्या जन्माबरोबरच तो पिंपळ लावला होता–म्हणजे हा पिंपळ माझा काका. चमत्कारीक वाटतं. अनेक शंका कोंदटून उठतात. पिंपळाची मुंज कशी केली

असेल? त्याचे मुंडण केलं असेल का ? जानवे कसे घातले असेल ? आणि लंगोटी तर हवीच. त्याशिवाय का मुंज ? ती कुठे नेसवायची ?

त्या मुंजीच्या गमती पाहायला त्यावेळी मी हवा होतो! पण हे कसे जमले असते ? जाऊ द्या !

शंकाच संपत नसत.

त्या पिंपळाविषयी माझ्या मनात वेगळी आपुलकी आहे वेगळा आदर आहे. कुतूहलमिश्रीत आपुलकीचा आदर. माझ्या वडिलांच्या वयाबरोबरच तो पिंपळ वाढत होता. माणसांचे वय आणि झाडाचे वय, याची तुलना करणेच किती गमतीचे !

समोरच्या परिसरात सर्वात उंच दिसणारा तो पिंपळ. माघातील लोभस उन्हाळा आपल्या असंख्य लवलवत्या पानानी बोलावणारा. वसंतात इतरांच्या वैभवाचे समाधान मानणारा आणि वर्षेत अश्रूंचा भार ठिबकून मोकळे मन करणारा.

ः या पिंपळावर भुते राहतात मुंजा बसलेला असतो कुणी तरी मनात ठसवलेले असते. खरे खरे वाटणारे मी दररोज मान वर करून सकाळ संध्याकाळ पिपळाच्या शेंड्याकडे पाहायचो. रात्री पाहायचा धीरच होत नसे. संध्याकाळ झाली, की सारी भुते स्वयंपाक करू लागतात म्हणे उलटचा हातापायांची भुते स्वयंपाक करतात तरी कशी?

शाळा लांब त्यामुळे घरी येताना नेहमी काळोख ठरलेला. आणि वाटेत हा पिंपळ. तोपर्यन्त संध्याकाळ झाल्याचे वा काळोख पडल्याचे भान नसे. पिंपळ दिसला की मात्र 'भीमरूपी महारुद्रा' मोठ्याने म्हणावे लागे. अशा वेळी पाने सळसळली कीं आवाज उंचावे. मनासमोर मारुती, राम, कृष्ण यांच्या मूर्ती उभ्या करायच्या; पण नेमक्या भुतांच्याच मूर्ती उभ्या राहात.

या पिंपळावर अनेक घरटी होती पण मग ती घरटी होती हे माहीत असूनही संध्याकाळी त्यांची भलतीच स्वरूपे दिसत.

आजोबा वारले तेव्हा ते नुसतेच झोपलेले होते ते वारले म्हणजे काय झाले हे आम्हाला कळलेच नव्हते. आम्हाला शेजारच्या घरी नेले. येऊन

पहातो तो आजोबा जाग्यावर नसलेले.

आजोबा कुठे ?

त्यांना पिंपळाकडे नेले–तिथून ते देवाकडे गेले

आम्ही पिंपळाकडे जाऊ लागताच आम्हाला अडविले. त्या दिवशी नुसती तळमळ.

दुसऱ्या दिवशी हळूच चोरून आम्ही पिंपळाकडे गेलो. तिथं केवळ राखेचा ढीग दिसत होता. आजोबा कुठे दिसेनात. मग आजीला पुनः पुन्हा भंडावून सोडले. ती बोलेना. कुणीच काही सांगेनात. त्या पिंपळाचा आणि आजोबांचा काय संबंध आहे हे समजेना. सगळेच गूढ. कुणाला विचारण्याची सोय नाहीं. मग मात्र त्या पिंपळाचीच भीती वाटू लागली. ज्या आजोबांनी पिंपळाची मुंज केली, तो पिंपळच मोठा होऊन आजोबांवर उलटला.

त्या पिंपळाचे लग्न झाल्याचे वा आम्हाला पिंपळकाकी मिळाल्याचे पुढे कधी ऐकले नाही.

आमच्या शेजारी मुंज झालेला पण 'सोडमुंज' न झालेला एक ब्रह्मचारी वारला. तो म्हणे मुंजा होऊन पिंपळावर जाऊन बसला.

शेजारच्या काशी आतेचे हे म्हणणे मला खरे वाटले. कारण तशीच एक गोष्ट घडली.

आमचा बबन्या एकदा पिंपळाजवळ गेला होता. त्याच्या पाठी एक कुत्रा लागला. बबनने त्या कुत्र्याला एक दगड मारला. कुत्रा केकाटत पळाला; पण बबन्याची मानच वाकडी झाली. सर्वांनी ती सरळ करण्याचा प्रयत्न केला. अनेक उपाय झाले. तेव्हा लोक म्हणाले की, हा मुंजाचा प्रताप. मुंजा मानेवर बसला.

मग त्या मुंजाला म्हणे काहीतरी करून घातले. हे काहीतरी म्हणजे काय असते ते अद्यापही मला समजलेले नाही.

बबन्याची मान तेव्हापासून चांगली झाली होती. त्या पिंपळाची मात्र मला भीती वाटू लागली. पिंपळाजवळ कुत्रा दिसला की मग फारच गाळण उडे. न जाणो, कदाचित माझीही मान वाकडी होईल.

पिंपळ आणि निरंकारी हे दोन आमचे रक्षक आहेत असे कुणीतरी सांगे. पैकी पिंपळ तर आजोबांचे रक्षण न करता त्यांना घेऊनच गेला होता. आणि निरंकारी म्हणून जो रक्षक आहे त्याचा काही अनुभव नाही. हा निरंकारी म्हणजे आंबा. मोठ्यांत मोठा दिसणारा हा वृक्ष. त्याचे आंबे कधी काढता येत नाहीत. पडले की घ्यायचे. निरंकाऱ्याच्या मुळाशी एक दगड आहे. त्याची पूजा करायची. तिथे म्हणे एक पिवळा साप राहतो. काही चूक झाली की दिसतो.

हे मुंजे, साप वगैरे भयंकर प्राणी या वृक्षाकडेच का राहतात कोण जाणे !

मला समजू लागल्यापासून मी हा पिंपळ पाहतो आहे. त्याच्या उच्छ्वासात माझे श्वास मिसळले आहेत. निरनिराळ्या ऋतूंतील त्याच्या बदलत्या रंगछटांनी विविध मनोविश्वे निर्माण केली आहेत. त्यात आदर आहे. भीती आहे, माया आहे, पाल्य पालकत्वाची माया.

लहानपणी आम्ही एक खेळ खेळत असू. 'तुझ्या हातावर कोणते झाड काढू?' पुरषा मला विचारी.

'पिंपळाचे.' मी उत्तर देई.

कारण पिंपळाची रेखीव व विलक्षण टोकदार पाने मला आवडत. खेळात पालखीच्या वेळी अब्दागीर उभे करीत, तसले आकार या पिंपळपानाचे वाटत. हे अब्दागीर माझ्या दोन्ही हातांवर उमटावेत.

पुरषाला मी पिंपळाचे नाव सुचवी ते यामुळे. मग तो माझ्या हातावर जोराने चापटी मारी. हात तांबडा लाल होईपर्यंत, दुखले तरी हाय म्हणत नसे. हातावर पिंपळ उमटणार ही आशा.

माझ्या हातावर पिंपळ उमटला असे मला प्रामाणिकपणे वाटे.

शेजारच्या वासूकाकाने पिंपळाच्या पानाचा आकार आपल्या छातीवर गोंदवून घेतला होता. बिब्ब्याचा डिंक पिंपळपानाला लावून ते पान छातीवर चिकटविले. सूज आली आणि गेली. पण पानाने आपली खूण कायम ठेवली.

ते पिंपळ-पान छातीवर उमटविण्याचे कारण मला नंतर कळले, त्याचे म्हणे कुणावर तरी प्रेम होते. त्या प्रेमाचा धिक्कार झाला, हृदयावर जणू त्याचा आघात बसला. मग ते हृदयच त्याने आपल्या छातीवर-कोरून घेतले.

काही असो, मला कौतुक वाटते ते त्याच्या रसिक वृत्तीचे. पिंपळाच्या पानाचा आणि हृदयाचा आकार एक. इतरांनी वासूकाकाला वेडयात काढला, तरी मला तसे कधी वाटलेच नाही. निसर्गाने मानवी हृदयात कसे नाते निर्माण केले आहे त्याचे ते एक मोठे प्रतीक वाटले.

एकदा अचानक चक्री वादळ झाले. बऱ्याच झाडांची नासधूस झाली. निसर्गाने आपले सामर्थ्य दाखविले. आपणच निर्माण केलेल्या वस्तू त्याने आपल्या कुशीत घेतल्या.

या वादळाच्या वेळी पिंपळाने आपले अक्राळ स्वरूप दाखविले. सारे अंग घुसळून त्याने थैमान घातले.

दादांच्या जन्माबरोबर जन्मलेला तो पिंपळ, त्यांच्या मुंजीबरोबर ज्याची मुंज केली होती असा तो पिंपळ, आपल्या वाढत्या विस्तारासह एकाएकी कोसळला.

थोडयाच दिवसात दादाही त्याला भेटण्यासाठी निघून गेले..आज दादा आमच्यात नाहीत.

चुलतेपणाचे नाते लावून जाणारा पिंपळही नाही. आहे तो केवळ स्मृतीचा पार! दिवसांच्या चिऱ्यानी बनवलेला!

० ० ०

# ४ : कातर वेळ

**लहानपणी** ही कविता मी एकली होती. तेव्हापासून कातरवेळेबद्दल एक वेगळीच प्रतिमा माझ्या मनांत उमटत गेली आहे.

कसली तरी काळजी, हुरहूर, थोडी उत्कंठा अशा भावनांनी भरलेले नेत्र कुणाची तरी प्रतिक्षा करीत आहेत असा भास होतो मला. या कातरवेळेचा चेहराच असा चिंतातुर आहे; तिचे पाय थकलेले आहेत; पण तरीही तिची ओढ रात्रीकडे आहे.

दिवसाची अजस्त्र धावपळ उरी घेऊन संध्याकाळ निघून गेली आहे. थोडं नदीच्या काठानं रेंगाळ, फुलांची चौकशी कर, मळचांतील पाऊल-वाटांशी गुलगुल गोष्टी करीत तेथेच थोडा वेळ काढ... कामावरून दमून आलेल्या, पण चेहऱ्यावर कर्तव्यसमाप्तीच्या समाधानानं घरी परतलेल्या मजुराप्रमाणं फिरणाऱ्या वाऱ्याच्या हातात हात घाल, कधी दूर दिव्यांची टिमटिमणारी टिंबं पाहाणाऱ्या लहान मुलांशी स्पर्धा कर, कधी घरांतल्या पाटावर बसून पत्नीनं दिलेल्या चहाच्या पेल्यांत छोटसं वादळ उठवून खिड-कीतून पळ काढ... कधी गुरांच्या घंटनादाबरोबर लय पकडीत पांदणीतून हळू चाल... असे अनेक प्रकारचे चाळे जाता जाता या संध्येनं केलेले असतात पण ही कातरवेळ 'शाकुंतल' मधील प्रौढ विदुषी गौतमीप्रमाणं या संध्येकडे पाहात असते.

एका वेगळ्या प्रकारच्या संथ पार्श्वसंगीताबरोबर ही कातरवेळ येते, तेव्हा तिचा चेहरा तारुण्यातील धुंदी ओसरल्यावर भक्तिमार्गाकडे वळलेल्या प्रौढेचा वाटतो. उंबरठ्यावर वाती वळत बसलेल्या आजीप्रमाणें ती पाय सोडून बसते. तोंडानं चिंधीचं गाणं सुरू असतं. समोरच्या खळ्याबाहेर पोफळी आपल्या शिपट्यांना कुशीत कवळून बसलेल्या दिसत असतात. केळीच्या पानाचं गोड स्मित त्यांच्या फुलांतून अकारण ओसरलेलं असतं. आवळीच्या, अगस्तीच्या पानांनी आपले असंख्य हात प्रार्थनेसाठी जोडलेले असतात. त्यानी संध्येच्या भैरवीत आळविलेले प्रार्थनेचे सूर सभोवार घुमत असतात. या साऱ्या वातावरणात कुठं पाल चुकचुकली की ही 'कृष्ण, कृष्ण' म्हणत बसते

या वेळी तुम्ही घरातल्या आरामखुर्चीवर बसाल. मात्र तुमच्या हातात पुस्तक नसेल. कारण पुस्तक घ्यायचा मोह तुम्हाला या वेळी होणारच नाही. खोलींतला दिवा लावावा असंही तुम्हाला वाटणार नाही. दिवस– रात्रीला जोडणाऱ्या अेका वेगळ्या झुलत्या पुलावर बसल्याप्रमाणं दोलायमान आवस्थेत सकाळपासून घडलेल्या घटनांची दृश्यं आपल्या मनःचक्षूसमोर आणून तुम्ही डोळे मिटून बसाल. याच वेळी पाळण्यातील नाजूक तान ऐकून तुमचं मन विचलित होईल. कारण तुमची पत्नी कुठंतरी बाहेर आपल्या कामात गर्क असेल. मग तुम्हांलाच उठून त्या पाळण्याकडे झोके देण्यासाठी जावं लागेल. एखाद्या अंगाई गीतानं तुमचे ओठ हलू लागतील साऱ्या खोलीत एक वेगळी वात्सल्यमय भावना तरळून जाईल चिमण्या, राघू, मैना झोपलेल्या असतील. निंबोणीच्या झाडाआड कातरलेला चंद्र पाहून तुम्ही थोडे व्याकुळ व्हाल. तरीही तुमचं गीत सुरूच असेल. पाळण्याच्या लयीबरोबर तुमच्या शब्दांना ताल फुटेल.

दर्यावरून परतणाऱ्या एखाद्या युवकाची ओढ तुम्हाला जाणवू लागेल. त्या दर्याच्या विशालतेनं तुम्ही क्षणभर थक्क होऊन जाल. लहरीप्रमाणं अनेक भावना उचंबळून येतील. त्यांच्या ओढाळ लहरींशी तुमचं नातं जुळेल. पण किनाऱ्यावरची उदासीनता तुमच्या मनात कारुण्य उत्पन्न करील. तुमच्या समोरच्या त्या दर्यावर्दीनं आपल्या जाळ्यातले मासे आपल्या घर-

धनिणीपुढं आणून ठेवल्यावर तिच्या चेहऱ्यावरचं हास्य मात्र तुम्हाला पाहायला मिळणार नाही. कारण त्याच वेळी संपूर्ण काळोख पडलेला असेल. आणि तेव्हा कुठं तुम्ही विचारतंद्रीतून जागे व्हाल! तुमचे पाळण्याकडचे हात यावेळी थांबलेले असतील, पण पाळण्यातील बाळ आपल्या ओठांच्या पाकळ्या मंदपणानं मिटून व डोळ्यांच्या पापण्यांच्या निळसर रेखा आपल्या गुलाबी गोबऱ्या गालांवर उमटवीत सुखानं झोपलेलं असेल... आणि त्याच वेळी तुमची पत्नी पाण्याची दूड घेऊन घरात येईल... मग तुम्हाला एखाद्या तत्त्वज्ञाप्रमाणं सांगावंसं वाटेल–

'कातरवेळी पाणी आणू नये !

'माहीत आहे,' असा भाव चेहऱ्यावर दाखवून चुलीतली लाकडं नीट करण्यासाठी ती सैंपाकघरात जाईल.

पुढच्या दारी जाऊन तुम्ही दार लावण्याच्या तयारीत असाल तेव्हा तुमचे हात क्षणभर दाराकडेच थांबतील. कारण लहानपणी आजीनं सांगितलेलं वाक्य तुम्हाला आठवलेलं असणार–

'कातरवेळी दार बंद करू नये; लक्ष्मी आंत येते या वेळी.'

तिचं ते वाक्य तुम्हाला लहानपणी पटलेलं असतं. पण आता तुम्ही त्या आठवणीनं मनातल्या मनात हसाल. ती आजी आज नसल्याची तुम्हाला जाणीव होईल, पण तरीही ते दार बंद करताना तुमचे हात थांबतील. पण शेवटी दार बंद करूनच याल, तेव्हा तुमच्या सुधारक मनानं जुन्या संस्कारांवर विजय मिळविल्याचं फसवं समाधान तुम्हाला लाभलेलं असेल...

उंबरठ्यावर पाय सोडून बसणाऱ्या आजीबाईप्रमाणे दिसणारी ही कातरवेळ यावेळी उठायच्या बेतात असते.

ही कातरवेळ किरकिरणारी का वाटते हे मात्र न सुटणारं कोडं आहे. कदाचित असं असेल–

विश्रांतीची जरुरी असूनसुद्धा पोटाच्या खळगीसाठी दिवस-रात्र काम करणाऱ्या मानवाकडे पाहून कदाचित तिला वाईट वाटत असेल. आपण त्याच्या विश्रांतीची वेळ ठरवून दिली असताही तो अगतिक बनून

सुस्कारे टाकतो आहे... तडफडतो आहे, हे तिला पाहवत नसेल. लहान मुलांना 'खेळू नका,' म्हणून सांगितल्यावरही त्यांनी न ऐकल्यामुळे मोठ्यांच्या मनात जे भाव उमटतात ते भाव या कातरवेळेच्या मनांत उमटून ती किरकिरणारी बनली असावी.

वेगवेगळ्या ऋतूत हिची स्वरूपं तरी किती बदलत असतात ! चिडीचिप्प पावसाळ्यात ही कातरवेळ कुठं हरवते तेच समजत नाही !

मेघांवर हासडलेल्या विजेच्या चाबकाचा टणत्कार ऐकून ती थरारून कुठंतरी लपून बसत असावी. आपल्या हुकुमानं नक्षत्र फुलावीत अशा करारीपणानं रोज वावरणारी कातरवेळ या वेळी अशी भ्याड बनलेली पाहून खरोखर आश्चर्य वाटतं.

मात्र एखाद्या पावसाळ्या दिवशी तिचं स्वरूप किती मनोहारी दिसतं. नृत्यमग्नेच्या पायांतील घुंगुर हरवल्यावर दिसणारी हुरहूर तिच्या चेहऱ्यावर या वेळी ओसंडत असते. नेहमी गंभीर वाटणारी कातरवेळ कधी पावसाचं धुंद गीत ऐकत सुस्तावत पडलेली असते, आणि रात्र आल्यामुळे आपला अधिकार संपला आहे याची जाणीवही तिला अशा वेळी होत नाही. पण असं तिचं स्वरूप क्वचितच पाह्यला मिळत. बहुधा साऱ्या पावसाळ्यात ही कुठंतरी हरवूनच बसते !

हिवाळ्यातील तिचं स्वरूप मात्र प्रत्येकाला हवंहवंसंच वाटतं. दिवसाची सोनेरी ऊब हवेत विरून गेल्यावर थंडीच्या गुलाबी पाकळ्या ती हळूच उधळून देते. ही उबदार थंडी आपल्याला कधीच नकोशी होत नाही. कार्तिक मार्गशीर्षाच्या गोड धुंदीत आपल्या जडावलेल्या पाकळ्या उघडून तुमच्याकडे पाहायचा तिचा प्रयत्न असतो. पण सतारीच्या स्वरांची मखमली ओढ साऱ्या शरीरभर पसरलेल्या कैफात तुम्हीही तिच्याकडे पाहू लागता. मलुललेल्या फुलांचा रेंगाळणारा मंद गंध तुमच्या नाकाला सुखद गुदगुल्या करू लागतो. झाडं आपलं गुपित डोंगराच्या कुशीत शिरून हळुवार आवाजांत सांगत असतात. अशावेळी ही कातरवेळ तुमच्या ओठावर आपलं बोट ठेवून नाजूक दटावणीत तुम्हाला सांगते, की तुम्ही त्या झाडांचं चोरटं गुपित ऐकत जाऊ नका. पण तुम्ही तिचे हे शब्द ऐकण्याच्या मनःस्थितीतच नसता.

तुमच्या ओठाशी हिनं आपल्या बोटांचा नाजुक स्पर्श केला आहे. याच धुंदीत तुम्ही असतां. पण ती मात्र तुमच्या या बेहोषीकडं पाहात नसते. अमाप पीक दिल्याच्या समाधानांत असलेल्या धरणीच्या आनंदात सहभागी व्हायला तिनं पळ काढलेला असतो. नाहींतरी तुम्हाला ती चुकवीतच असते. संध्येच्या विरलेल्या हळदीचे काळोखानं करडे बनलेले ठसे ती आपल्या गालांवरून पुसून टाकतच नाही. तुमची आपल्याला दृष्ट लागेल अशी तिला सारखी भीति वाटत असते.

हिवाळ्यातील रसरशीत नवयौवनेचं हे तिचं स्वरूप उन्हाळ्यात मात्र टिकून राहात नाही. विसाव्याला आलेल्या मजुराप्रमाणं ती या उन्हाळ्यात दमली भागलेली वाटते. सारा उत्साह आंबलेला असतो. दिवसांची भेसूर स्वप्नं डोळ्यात थैमान घालत असतात. आणि रात्रीची माया तर दूर असते. सूर्याची उग्रता तिला अजूनही भेडसावीत असते; चांदण्याचं संगीत झिरपायला अवकाश असतो. अशा मधल्या वेळी केशवसुतांच्या 'झपूर्झा' प्रमाणं हिचं स्वरूप असतं.

कातरवेळेबद्दल कुणाची काहीही मतं असोत; मला मात्र तिच्याबद्दल जे एक वेगळं आकर्षण वाटत गेलं आहे, ते तिच्या या 'झपूर्झा' स्थितीमुळे! मनाची एकतानता यावेळी जितकी साधते तितकी ती अन्य कोणत्याच वेळी साधत नाही. तिचं हे स्वरूप न समजल्यामुळं पूर्वीच्या लोकांनीं हिला अशुभ मानली आहे. यावेळी कोणत्याही नवीन गोष्टीचा आरंभ करायला ते तयार नव्हते. त्या लोकांची मतं कशीही असोत, तुम्हालाच मला थोडं विचारायचं आहे; संथ जलाशयावरून तरंगत येणाऱ्या ज्योत्स्नेची पहिली चाहूल दाखविणाऱ्या या वेळेला तुम्ही अशुभ कशी म्हणाल? क्षितिजाला संकेत करून त्याच्याकडून स्वर्ग-धरेचं, दिवसरात्रीचं मंगल मीलन घडवून आणणाऱ्या या कातरवेळेला अशुभ म्हणायला तुमची जिव्हा कशी धजेल?

० ० ०

# ५ : चिकणं

**पाठीप्रमाणे** मनाचेही मणके असावेत. नाहीतर प्रौढपण व बालपण यांच्या मधल्या काळाचं अंतर इतक्या ताठपणानं उभं राहिलं नसतं

आणि हे सारं मला आज पटत आहे. यावेळी मी एकटाच आहे आणि दुपारी पायाभोवती मुडपून राहणाऱ्या छायेप्रमाणं मन सभोवती मुडपण्याचा व्यर्थ प्रयत्न चालला आहे. समोर एक झुडूप आहे...जुन्या बायका अनशीच्या दोऱ्यांत काळे मणी ओवून त्यांचे पेड बनवीत. आठवतंय ? तसलेच काळे मणी आपल्या फांद्यातून ओवणारं झुडूप काळी काळी फळं– तुरट रुचीची. आंबट गोडीची हीच ती चिकणं !

ही चिकणंच समोर दिसताहेत. कोकणांत अशा झुडपांचं वरदानच. माउलीच्या सड्यावर या झुडुपांची दाटी आहे. काजच्या फांद्याआड लपून राहणारी; करवंदीच्या काटेरी रोमांचाच्या आधारावर सुरक्षितपणाचा आव आणणारी; दहा जणीत उंचच उंच दिसणाऱ्या एखाद्या पोरीप्रमाणे जिची एखादी फांदी उंच वाढली आहे अशी

या चिकणांची आठवणही समोरच्या फळांप्रमाणं तुरट. प्रथमतः खरं म्हणजे ही चिकणं मला लहानपणी माहीतच नव्हती. त्यांना चिकणं का म्हणतात ते अद्यापही मला कोडं आहे. कोकणांत चिकण माती फार त्या चिकण मातींत वाढणारी म्हणून ही चिकणं की काय ? मग कोकणच्या

माणसांनाही चिकणंच म्हटलं पाहिजे. तसं कुणी म्हणतही असतील. हे आपलं तर्कशास्त्राप्रमाणं. पण कांही झालं तरी ही फळं चिकण नाहीत. आमच्या खळ्यासमोर पूर्वी एक भोकराचं मोठं झाड होतं. वनमहोत्सवाच्या सप्ताहात कुणीतरी ते तोडून टाकलं, दुसरं झाड लावण्यासाठी. तर त्या झाडावर पूर्वी अशी भोकरं लगडायची ! चिकट फारच ! एकदा हाताला चिकटली कीं लोचट घेणेकऱ्याप्रमाणं सुटायची नाहीत. तशी कांही ही चिकणं खास नाहीत. या भोकरांना चिकणं म्हणायला हवं होतं व चिकणांना भोकरं. प्रत्येक फळाला नाव कसं सार्थ असतं ? पण या चिकणाचं सारंच वेगळं. नांव चिकणं; पण असतात सुटसुटीत. दिसण्यांत छोटी काळी द्राक्षे पण असतात तुरट चवीची. आंब्यांच्या व माडांच्या कोकणात आंबे व नारळ खायला मिळू नये तसं सारं.

या चिकणांचा शोध मला पुढं एकदा अचानक लागला. आणि असले कांही शोध लागण्याचं वय तेच. आपल्याला पोहतां येतं हा शोध त्याच वेळीं लागतो. सायकलीवर बसतां येतं हें त्या वयांतच कळायच. आणि शेजारची काकी डोकीवर तांबड्या लुगड्याचा पदर घट्ट लपेटून मागच्या दारच्या मांगरांत दोन महिन्यातून एकदा हळूच जाऊन का येते, याचाही पराक्रमी शोध लागण्याचा, पण बावळटपणाचा आव आणून वावरण्याचा काळही तोच.

अशा या काळांत ही चिकणं शाळेत मार खायला लावतात मार पचविण्याची ताकद व हौस त्या वेळी असते. कारण हा मोहच कांही और आहे.

सकाळची शाळा असावी–आणि लहानपणच्या सगळ्याच शाळा सकाळच्या असतात–ही शाळा खेडेगांवातली असावी, म्हणजे घरापासून लांब. शंभर वेळा तरी पँट सावरण्याची पाळी येण्याइतपत. उठायला उशीर झाल्यामुळं लांब लांब उन्हांनी हिणवून सोडावं. तशांतच पिवळ्या उन्हाच्या रेशमाखाली गुंडाळलेली काळी–करडीं चिकणं दृष्टीला पडावी. मग या मोहाच्या क्षणाबद्दल सोलकर मास्तरांच्या माराचं मोल सोसायलाच हवं.

शाळेला उशीर झाला तरी पर्वा नाही. सोलकर मास्तरांच्या करड्या दृष्टीची कदर नाही मराठी चौथीतलं म्हणजे शेवटचं वर्ष. पुढं समोरच्या इंग्रजी शाळेत जायला मिळणार या आशेंत स्वत:ला गुरफटवून घ्यायचा तो वर्ग. सुशीला केळजी आपल्या गणिताच्या हुशारीवर वर्गावर प्रमुख म्हणून निवडून येते व आमच्या चुगल्या सोलकर मास्तरना सांगते. अशा वेळी तिला ' राप ' कसा शिकवावा याची काळजी करण्यांत संपणारं तें वर्ष. आपण इंग्रजी शिकूं लागलों की याचा सूड घेऊं असं मनाशी ठरवून परीक्षेच्या वेळी थोडा गंभीरपणा शिकविणारं असं तें वर्ष.

पण तरीही चिकणांच्या हंगामांत सारे बेत कसे विसरले जातात !

एखादा कर्तव्यदक्ष शानू उगाच भारदस्त चेहरा करून जास्तींत जास्त वेंधळेपणांत सुख मानीत शाळेला निघतो पण वाटेत पुरुषोत्तम गवंडे भेटला की मग विचारायला नको ! कस्तुरी आमच्याच कंपूतली. पण तीही उशीर झाला म्हणून ओरडते. मास्तरांच्या शिक्षेची जाणीव करून देते पण पुरुषोत्तम मास्तरांच्या बारशाला जेवलेला ! तो म्हणतो—

' अरे मास्तरनी काठी पुढं केली की, आपण बोटं खाली करून तळवा पुढं करायचा म्हणजे मार लागत नाही. '

त्याला सगळं समजतं. त्याचा अनुभव दांडगा. वर्गातील कुणाकुणाच्या भानगडी त्यालाच विचारा. तेव्हा त्याच्या सांगण्यावर नेहमीच विश्वास बसतो. आणि तो आमच्या पाठीशी असला की सुशीलेचीही भीति वाटत नाही.

साहजिकच चिकणांनी खिसे भरतात तेव्हा कुठं लक्षांत येतं की अजून शाळा बरीच दूर आहे.

या चिकणांची माहिती मास्तरांकडूनच समजते. मास्तरांकडून तशी बरीच माहिती समजते.

एखादे वेळी काही कारणानं उशीर झालेला असतो. घरी पाणी भरायचं असतं. आंघोळ व्हायची असते. घरचे देव पाण्यांत बुचकळायचे असतात, अगर कुठंतरी एकादशणी करायला जायचं असतं. सारं आटोपून शाळेला उशीर होणारच. मग मास्तर फर्मावतात—

' हात पुढं कर. '

वेंधळेपणानं हात पुढं होतो. एक-दोन-तीन-चार-छडीचे आवाज टरकतात. 'हाय' म्हणायचं नाही. मग मास्तर विचारतात,

'चिकणं खातांना लाज नाही वाटत, छड्या घेतांना अभिमान डिवचतो?'

अशा वेळी चेहरा जास्त जिज्ञासू बनतो. मारामुळं त्रस्त झालेला, पण आपल्या मारामुळं सुशीलेचं समाधान झालेलं असतं, म्हणून लाजलेला चेहरा कुणाला न दिसेल अशा बेतानं खाली वाकतो. 'जा चालता हो जागेवर' हें मास्तरांचं वाक्य ऐकूंच येत नाही. मनांत मात्र वेगळेच विचार. 'ही चिकणं म्हणजे कसली फळं आहेत? शाळा सुटल्यावर शोध घ्यायचाच' मग सदू दादूचा काळ काम वेग केव्हां संपतो, 'पडू आजारी' चीं कविता केव्हा म्हणून होते, रांगेत आपण सर्वांच्या मागं पडतो की पुढं जातो, याकडे लक्ष नसतं. ते रोजचंच असतं. कविता पाठ म्हणतां न आली की पाठ म्हणणाऱ्या मुलानं आपल्या थोबाडांत मारून आपल्या वर नंबर पटकवायचा. पण तेही त्या वेळी सुसह्य वाटतं. डोळ्यापुढं निराळंच दृश्य.

शाळा सुटली की पाय शाळेच्या पायऱ्या ओलांडून पुढं. पाय रस्त्यानं कधीच चालणार नाहीत. तशी सवय पायांना नसते. वाट डोंगरांतली. आड वळणाची. मग प्रत्येक फळ बारकाईनं पाहायचं. हे पंकुळणीचं. तांबडं. याच्यावर काळे डाग आहेत. सर्पानं म्हणे चावलेलं असतं. त्याचेच दात हे छे! विष पोटांत गेलं की घरी पोचायला होणार नाही. सोमा गुरवाला म्हणे कुठल्याशा जनावराचा नुसता फेस लागला. मेला. ही हसोळीची काळी फळं. बारीक, आंबट-गोड चवीची. कितीही चावली तरी चोयट्यांतूनही गोडी शिल्लक राहते. ही फळे हसवितात की काय कुणास ठाऊक! मास्तर मात्र एखाद्या चावटपणाला मुलं हसली की म्हणतात, 'आज हसोळी पिकली आहे का रे?' पण हसोळी खाऊन हसं आल्याचं कधीच पाहिलेलं नसतं.

ही बिबटं. पिवळी जर्द जर्दाळूसारखी. पण हिरवी खाल्ली की घशाला खवखवणारी. भाजून खायची. मग त्याची चव गुळमट लागते. बिब्बेही फोडून खातां येतात. डोंगराच्या उतरंडीवरून चालतांना पाचोळ्याच्या तळी

सापडणाऱ्या या चारोळ्या. दगडांनी फोडून आंतील गर पडजिभेला पाजळून ठेवतो. मग बारके बारके गर तोंडात साठवून एकदम चावायचे. तेव्हा एक काजूगर खाल्ल्यासारखं वाटणार. या चारोळ्या खिशांत जाऊन तळ केव्हा गाठतात, ते कुणालाच कळायचं नाही.

पण या सर्व शोधाशोधीत चिकणं सापडत नाहीत. मग गेंगण्या कोल्ह्याकडून याचा पत्ता लागतो.

हात्तीच्या ! ही फळं खातात ? ही रोजच पाहतो की आपण ! एक नवा शोध लागल्याचा आनंद. घरी जायला उशीर झालाय याची जाणीव होऊं न देणारा हा आनंद.

आमच्या कंपनींत सर्वांत भोळा नाना. आणि बारा गावचं पाणी पिऊनही चेहऱ्यावर भोळेपणाचा अभिनय करणारा शानू या दोहोंपैकी कुणीतरी एकाला आमच्या मंडळींत ठेवावा. दोघेहीं एकत्र असले की नान्याचे हाल.

शानू नेमका काही तरी क्लृप्ति काढून आम्हाला आपल्याकडे आकर्षित करायचा. शाळेकडे जातांना एक मोठा पिंपळ आहे. त्या पिंपळाच्या वरच्या बाजूला आणखी खूप पिंपळ आहेत. गडगा ओलांडून वर चढायचं. शाळेकडे लवकर पोचविणारी वाट त्या गडग्यांतून जाणारी असते.

त्या पिंपळाच्या पाराभोवती झुडुपांची जाळी असते. मध्येच एखादा कोहाळा ठेवलेला दिसतो. पिंजर घालून ठेवलेला. फारच भयानक दिसतो. कुणीतरी काहीतरी करून घालतो म्हणे असं काहीतरी करून घालण्यासाठी हा पिंपळच योग्य त्या पिंपळाकडे हटकून सर्प असतो. सर्पाला 'सर्प' कधीच म्हणायचं नाही तो फार म्हातारा असतो. त्याचे केस सोनेरी असतात. सभोवती तेज पसरतं. आणि ते नेमकं शानूला दिसतं. त्याची मुंज झालेली असते. आमच्याही मुंजी झालेल्या असतात. पण त्याची सोडमुंज व्हायची असते. तेव्हा तो खरा ब्रह्मचारी, त्यालाच तो तेजस्वी सर्प दिसतो. तो डोळे किलकिले करून पुढं चालतो. आम्ही त्या बाजूला पाहायचा प्रयत्न करतो.

'अरे. पापी माणसांना दिसणार नाही !'

मग आम्ही 'दिसला' म्हणून सांगतो. नाही तर आम्ही पापी ठरू. तो विचारतो,

'कोण दिसला ?'

'सर्प' आम्ही म्हणतो.

'मामा म्हण. त्याचं नांव घ्यायचं नाही.'

'मामा' आम्ही म्हणतो.

'कफल्लक, कफल्लक' तो मंत्र पुटपुटतो.

'कफल्लक, कफल्लक' आम्ही त्याला साथ देतो.

'आस्तिक'

'आस्तिक' आम्ही उच्चारतो

शेवटीं पुन्हा एकदा तो 'मामा' म्हणतो. आम्ही भक्तिभावानं त्याला 'मामा' म्हणतो.. आपण अद्‌भुत कांहीतरी दाखवीत आहोंत असा आभास तो निर्माण करतो आम्ही बावळटपणानं ते मान्य करतो. शानू केवढा पुण्यवान्. आमची मनोमन खात्री होते सर्व सर्पांच्या कथांचे चर्वित चर्वण होते. शाळेत पोचेपर्यंत तोच विषय शाळेतील वातावरणाचा उबग कधींच येत नाही. कारण शाळेंतील वातावरण मनाला स्पर्श करतंय् कशाला ? मनांत इतरच विषय अधिक वाटेत पाहिलेल्या गोष्टींचं वर्णन मनांत चालूच असतं. तसं मनातल्या मनांत बोलण्याची शाळेतच खूप सवय लागलेली असते. मास्तरांचे शब्द ऐकतात शाळेच्या भिंती आणि त्यांची आवडती तथाकथित मुलं

लहानपणीचा काळ म्हणजे शिकण्याचा काळच नव्हे. तो काळ असतो चिकणा-बोरांचा काळ. मास्तर शिकवितात ते खरं म्हणजे लहानपणी कळलेलंच नसतं. ते धडे मोठेपणीच खरे समजतात. आणि त्यांत वाईट वाटण्यासारखं कांही नाही. आपल्याला लहानपणी कांही समजलं नाही म्हणून दुःख मानायला नको. रूढार्थानं जरी आपल्याला कळत नसलं, तरी प्रत्यक्षात आपल्याला खूप कळलेलं असतं. मोठेपणी जे अनुभव घेता यत नाहीत, ते अनुभव लहानपणीच मिळालेले असतात. तुमच्या नकळतच तुमच्या स्मृतीच्या पिशव्या भरलेल्या असतात. आयुष्यभर पुरणारं संस्काराचं वैभव या चिकणा–बोरांच्या काळातच मनाच्या कपाटाला भलं मोठ कुलूप लावून बंदिस्त करून ठेवलेलं असतं.

आताही समोरचं चिकणांचं झुडुप दिसतांच मी ते कुलूप काढू शकलो आहे. तो शानू आता प्रख्यात नट झाला आहे. बावळट नान्या ग्रामपंचायतींत पट्टेवाल्याची भूमिका करतो आहे. वर्गांत पहिला नंबर कधीही न चुकविणारी सुशिला आपल्या मुलांना शाळेंत पिटाळण्यासाठी त्यांना सजविण्यात गुंतली आहे. मधूनच प्रसिद्ध झालेला माझा एखादा लेख स्वतःच्या वाचनांत आल्याबद्दल मला कळविते आहे. आणि पुरशा आता मोठा आमदार झाला आहे.

आणि काळाचं हे एवढं अंतर मनाच्या मणक्यांनीं सहन केलं आहे.

० ० ०

# ६ : वेगळं विश्व

एखादा विषय देऊन अगर अमुक एक प्रसंगावरच कथा लिहा असं सांगून तुम्हाला कोणी संकटात घातलंय ?

इतर सर्व संकटं परवडली. पण हे बंधन तुम्हाला परवडणार नाही खास !

माझ्यावर हा प्रसंग ओढवला होता म्हणून मला त्याची आठवण झाली. 'अशी असावी कविता म्हणूनी ..' म्हणून सांगणाऱ्या महाभागाला केशवसुतांनी रोख ठोक सवाल टाकला आहे.

' असं सांगायला तुम्ही कोण मोठे लागून गेलात ?'

कांहीनी या त्यांच्या वृत्तीवर घमेंडखोरपणाचा आरोप केला आहे; मला माहीत आहे, कांहीनी त्यांची (शब्दातून) पाठ थोपटली आहे. मला वाटतं तुम्हीही असंच कांहीसं केलं असलं पाहिजे. केशवसुतांची भूमिका तुम्हाला निश्चित पटेल.

केव्हा ?

तुमच्यातल्या कलावंताला कुणी बंदिवान केला तर !

एका प्रसिद्ध शैक्षणिक संस्थेने एक प्रकल्प योजला होता. साधारणत: कुमार वयातील मुलांच्या मानस शास्त्राला धरून, त्यांच्यावर सुंदर संस्कार घडविणारं लेखन साहित्य मागविलं गेलं होतं. माझ्याकडून कथा मागविली होती.

मागविली होती म्हणण्यापेक्षां त्या मंडळातील एका प्रमुख चालकानं प्रत्यक्ष येऊन मला त्रास दिला होता. अनेक प्रकारे माझी समजूत घालण्याचा प्रयत्न करून शेवटी मला विचारलं होतं,

'हं, मग कशावर लिहितां ? बोला-'

त्यांना उत्तर लवकर हवं होतं. ते विषय पक्का करून जाणार होते. त्यांना केवळ विषयच नको होता; संपूर्ण आराखडा हवा होता. त्यांच्या छापील पत्रकात त्याची नोंद होणार होती.

मनात दोन वेगवेगळी विश्वं निर्माण झाली. एक मोठी अवाढव्य भिंत त्या दोन विश्वांच्या मधोमध उभी राहिली

एका विश्वांत मी होतो. मानवी मनोव्यथा शब्दस्पर्शी करणारा. आणि दुसऱ्या विश्वात माझं दुसरं रूप उभं होतं. ते वास्तव होतं. चरफडणारं, अनुभवांचा वेध घेऊनही फसलेलं. विकलांग असं.

खरोखरच दोन भाग झाले होते–

एक सत्य दुसरा सत्याचा आभास. तोच जगाला हवा होता. त्याला बंधनं होती. मर्यादा होती. त्याचे शब्द मूर्त होते अमूर्त निराकार शब्दांना फोडून बाहेर पडणारं ते फसवं काव्य होतं.

त्या सद्गृहस्थांना मी त्यावेळी उत्तर उत्तर देऊं शकलो नव्हतो. दुसऱ्या दिवशी सांगण्याचं वचन दिलं. आणि ते बाहेर पडले.

माझं मन अनेक प्रश्नांनी गुदमरून गेलं.

कोणता क्षण पकडायचा ? चित्रांकित करायचा ? बोलका करायचा ? अनेक क्षणांच्या गर्दीनं माझं विश्व भरून गेलं

पण गर्दीतूनही वाट काढून चालणाऱ्या सोवळ्या ब्राह्मणाप्रमाणे मला जायचं होतं. मुलांना पेलणारं लेखन मला करायचं होतं. त्यांच्यावर चांगला संस्कार घडविणारी, त्यांच्या मानसशास्त्राप्रमाणं लिहिलेली अशी एखादी कथा द्यायची म्हणजे—

माझ्या कपाटांतील मित्रमंडळीच्या चेहऱ्याकडे मी आसुसलेल्या व करुणापूर्ण नजरेनं पाहू लागलो त्या सर्वांनी माझ्या मनांत चाललेली वादळं ऐकावी असं मला वाटत होतं

माझ्या रोजच्या व्यावहारिक विश्वात प्रवेश करायचं ठरविलं मी.

मुलांना पौराणिक कथा द्याव्यात, पुराणांतील आदर्श मुलांपुढं ठेवावेत. कर्णाचं औदार्य रंगवावं. आजच्या गुंतागुंतीच्या जीवनात सर्व आदर्शच नष्ट होत चालले आहेत. मनाचा विशालपणा, औदार्य तर कुठच्या तळाला लागलं आहे, ते समजत नाही.

माझं उपदेशक मन चिंता करू लागलं.

माणुसकीच्या ओलाव्यानं भरलेले प्रसंग मी हुडकूं लागलो. रामायणांतले प्रसंग तरल धुक्याप्रमाणं सरकून गेले. त्यांतील एक एक प्रसंग क्षणभर एखाद्या रहाटगाड्यांतील पोहऱ्याप्रमाणं माझ्या समोरून सरकून जाई.

'तुला लिहायचं आहे ना? लिही. भरताच्या बंधुप्रेमाची अमर झलक दाखव मुलांना त्याचं चिरंतन मूल्य समजूं द्या मुलांना. त्यांतला आनंद लुटूं द्या.'

उर्मिला केविलवाण्या नजरेनं माझ्याकडे पाहूं लागली वाल्मीकीनें तिच्यावर अन्याय केला आहे. उर्मिलेचं दुःख फार मोठं आहे...सीतेच्या दुःखापुढं कवीला त्याची किंमत वाटली नाहीं 'माझं दुःख जगाला सांग विरहाग्नीनं माझी राख होतेय् मी दुःखी आहे अश्रूंची नदीच गोठून गेलीय माझी तरीही माझा आक्रोश कुणीच का ऐकत नाही? कुणीच का माझ्याकडे पाहत नाहीं?...'

मला तो आक्रोश ऐकवेना. कानावर हात ठेवून मी दुसरीकडे पाहूं लागलों. त्यानंतर कोणताही प्रसंग माझ्यासमोर स्थिरपणानं उभा राहीना.

महाभारताची नांदी सुरू झाली. धूप दरवळला. नदीच्या चेहऱ्यावर ही उभी कोण? अरेरे! केस पाठीवर मुक्त सोडलेत हिनं. हातात हिच्या तेजस्वी बालक दिसत आहे. ते बिचारं हसत आहे. आणि ही? आसवांनी त्याला धुवून काढते आहे. त्या बाळाला न्हाऊं घालण्याचा पुढचा सारा सोहळा ती आताच उरकून घेत आहे. सारे अश्रू त्या बाळावरून ओघळत नदीत मिळताहेत.

मातृत्व भोगूनही ती अभोगी आहे. जगातल्या साऱ्या मातांनी आपला पुत्रवियोग हिच्या स्वाधीन केला आहे. ही सोसते आहे. तोंड असून हिला

बोलता येत नाही हृदय असून उघडता येत नाही.

विश्वाच्या नजरांचे भाले चोहींकडून घेरताहेत. ही कुलटा···ही जारिणी···ही पातकी

माझं सोवळं मन एकदम जागृत झालं. असली अनीतीची कथा मुलांना सांगायची ?

जागरण झाल्याप्रमाणे मी डोळे चोळून पाहत होतो. डोळे फाडून पाहत होतो

पाण्यांत पीठ कालवून दूध म्हणून प्यायला देणाऱ्या मातेला, ‘आई, मी दूध प्यालो ग !’ म्हणून दुडूदुडू धावत जाणारा कोवळा पोर मोठा होऊन वृद्ध होऊन माझ्यापुढं उभा राहिला.

. आपलं दारिद्रय लपविण्यासाठी माझ्या आईनं मला फसविलं...मी आभासावर संतुष्ट राहिलो. युध्दप्रसंगीही न डगमगणारं माझं मन त्या प्रसंगानं आक्रोशत आहे ..हळहळत आहे ..माझं चित्र तू मुलांना दाखवू नकोस माझ्यापुढं ठेवलेले खोटे आदर्श लोकांना कळवून उद्याच्या पिढीला तू दुःखात लोटशील ..माझ्याकडे पाहू नकोस पाहू नकोस ..

तेल मागत फिरणारा तो वृध्द नाहीसा झाला.

पुराणातील कथा मुलांना सांगायच्या ? त्या अमर कथांना माझ्या सारख्यानं रंगसफेतीचे डाग लावायचे ?

त्यापेक्षा आधुनिक वास्तव कथा–

पुन्हां मी कपाट उघडलं. बालकवींच्या जीवनावर आधारलेलं एक पुस्तक माझ्यासमोर दिसलं. त्यातला तो रमाई-बालकवींचा नाटयमय प्रसंग माझ्या डोळयासमोरून हालेना अनेकदा वादाचं रणांगण ठरलेली ती रमाई . बालकवींसारख्या भोळयाभाबडया जीवाचा तो कविमित्र... आपलं वासनामय जीवन मातृप्रेमाच्या बुरख्याआड लपवून बालकवीसारख्या सोज्वळ व निरागस कविमनाला त्यात जखडून ठेवणारा तो मित्र... सत्याचा आभास करून फसविणारा..आणि मातृप्रेमाच्या असीम भावनेनं भारावलेल्या कवीचा गाडीखाली झालेला तो हृदय फोडणारा अंत...

किती नाटयपूर्ण प्र संग आहे हा कथेसाठी ? पण हा प्रसंग रंगवायचा

म्हणजे त्यातील मनोविश्लेषण आले. कविमनाच्या आंतरिक व्यथेच्या आड दडलेली खोल जखम किती हळुवारपणानं टिपायला हवी! हे सारं रंगवायला किती प्रतिभासंपन्न लेखक हवा! आपल्यासारख्या सामान्यानं ते रंगवायचं म्हणजे—

मी त्या पुस्तकावरून नजर बदलली. एव्हांना काळोख पडून दिवेलागण झाली होती. रस्त्यावर मात्र मानवी फुलपाखरांचे रंगीबेरंगी थवे अजूनही फिरत होते. शब्दांच्या काचा खळाळत होत्या.

हे खरं जीवन. ज्याला कसलाच आकार नाही असं. विसंगतीनं पेरलेलं विफल जीवनावर पांघरूण घालण्यासाठी झकपक् बनून रस्त्यावरून फिरणारं जीवन हे रंगवायला काय हरकत आहे? या दुःखांतूनही आनंदपर्यवसायी नाटक तयार करता येईल.

कुठच्या तरी ट्रीपसाठी आलेल्या मुलांचा थवा समोरच्या इमारतीत उतरला होता. त्यांचा किलबिलाट त्यांच्या मास्तरांना आवरतां येत नव्हता. उद्याच्या जगाची जाणीव त्या पोरांना नव्हती. भविष्याचा पडदा मखमली आहे, हेंच खरं. त्या पडद्याच्या आतील पापांची जाणीव त्यांना होता नये.

बाकी कुणी सांगावं? त्या पडद्याच्या आत सुखाची दृश्यंही असू शकतील. इंद्राचे आखाडे असतील. अथवा फाटलेल्या—आभाळाला ठिगळचा लावण्याचं महान काम करण्यात गुंतून पडल्याचं ढोंग करणारे महान नटही असतील.

पण हें अज्ञात आहे हेच सुखाचं आहे त्या मुलांना तसंच जर राहता आलं असतं तर

माझ्या समोरच्या जगांत विविधता होती. त्यांतून एकात्मता मला साधायाची होती. एखादी स्पष्ट आकृती मला हवी होती. रसरंगानं निथळणारी अशी. भावनांनी भारलेली, शृंगारानं नटलेली अशी आकृती मला सांधायची होती.

पण हे सारं शोधून काढायचं म्हणजे त्यासाठी मनाची तादात्म्यशक्ती किती वाढायला हवी! केवढं चिंतन हवं. झटपट विद्यालयाच्या कारखान्यातून ते घडणारं नव्हतं. ते केवळ उथळ घडलं असतं; त्याला चिरंतनाचे पैलू पडले नसते.

पण हे पैल पाडण्यासाठी योग्य साधनाचा शोध केला पाहिजे.

आणि इथंच तर घोडं पेंड खात होतं.

सकाळी मला त्या सद्गृहस्थांना उत्तर द्यायचं होतं.

जुन्या कथांना नवा मुलामा चढवायचा. भाषेचा नवा फुलोरा केला की झालं लेखन, नवनिर्मिति तरी किंवा निर्मितीचा आभास तरी

जगात आणखी वेगळं ते काय घडतं. या फसव्या समाधानासाठीच तर जग झुरत आहे.

मृगजळाचं पाणीच पिऊन त्याला तहान भागवायची आहे. जुन्या जलाशयांतच नवी नवी रुपे त्याला पाहावयाची आहेत.

ही आत्मवंचना आहे हे मी कबूल करतो. पण निदान जगाच्या मायाबाजारात तरी हिंडाय फिरायला मिळतंय ना ! नाही तरी भवभूतीसारख्यानं आमची सोय करून ठेवलीच आहे. त्या आशेवर तरी काही काळ मायाबाजारात रममाण व्हायला हरकत नाही.

विचार करूनही मनाला वाट सापडेना. मनाच्या या दुसऱ्या विश्वात माझा कोंडमारा होऊ लागला. शेवटी ' जग तैसे भले, काय होई ते पाहावे ' असा तुकारामासारखा सोईस्कर विचार करून गप्प राहिलो

सकाळी उठलो तेव्हा रात्रीचा मनाचा गोंधळ संपला होता. मन जणू आरसपानो बनलं होतं. हवेत गुलजारपणा होता. दिवसाच्या पोटी दडलेली ' अजस्त्र धांदळ ' सैरावैरा बाहेर पडत होती

मला माझ्या व्यवसायाकडे वळणं भाग होतं. आज शाळा होती. मुलांच्या तासाची तयारी करायची होती. वह्या तपासायच्या होत्या. पेपराचं पुडकं टेबलावर पडलं होतं आज कथा लिहून एकदा त्या मंडळाच्या तोंडावर फेकून मी मोकळा होणार होतो. त्यांना हवी असलेली त्यांच्याच चौकटीत बसणारी. कुमार वयाच्या मुलांवर उत्तम संस्कार घडविणारी कथा मी लिहिणार होतो. मी कागद घेतला आणि कथेचं शीर्षक देऊन टाकलं

' खोटे बोलण्याचा परिणाम ! '

० ० ०

# ७ : मळलेली वाट

"हं. अिथून चला. नाकासमोर अगऽदी हं. अिथून मळलेली वाट आहे. त्या वडाला अुजवीकडे टाका."

तुमच्या अज्ञानाकडे पाहून तुम्हाला भेटलेला तो मनुष्य तुमची कीव करीत हे सांगतो तो या वाटेवरचा रोजचा प्रवासी आहे. तुम्ही मात्र अनोळखी माळावरून एकट्यानेच भीतभीत जाणारे. शहरी संस्कृतीत वाढलेले. चुकून एखाद्या सुटीत खेड्यात येऊन तुमच्या एखाद्या नातेवाईकाकडे जायची इच्छा मनात धरणारे. पुष्कळ दिवस तीं माणसं तुम्हाला बोलावून थकतात. एखादी लोणकढी मारून तुम्ही टाळाटाळ केलेली असते. वास्तविक तुम्हाला त्यांच्याकडे जायचंच असतं. पण ते गाव पडलं मोटार रस्त्यापासून दूर... अगदी खेडेगाव. सायकल देखील जायला धजत नाही.

लहानपणीं तुम्ही वारंवार गेलेले असता. खूप खूप मैल तुडवीत, उड्या मारीत. मोठेपणीच पाय परावलंबी बनतात. तुमच्या नोकरीच्या गावात तुम्हाला डांबरी रस्ते आहेत. शिवाय चालायला त्रास कमी, वगैरे.

आता एवढं पाच-सहा मैल अंतर तोडायचं म्हणजे मनातल्या मनात हजार वेळा एस्. टी. ची आठवण काढता ! पहिला उत्साह संपून तुम्ही फक्त पायाना ओढून नेत असता. घामानं चिंब झालेले. वाट चुकण्याच्या भीतीनं थोडेथोडे शंकित बनलेले. कुणीतरी भेटेल तर बरं होईल. वेळी

कुणीतरी भेटतो. कितीतरी मागून येऊन तुम्हाला तो गाठतो. करं-करं जुतं वाजवीत तुमच्याकडे पाहात तो तुमच्या पुढं सटकतो. स्वतःचीच लाज वाटून तुम्ही त्याला वाट विचारता. आणि तो जे सांगेल ते लक्षपूर्वक ऐकत राहता. आणि एव्हाना तो फार पुढं गेलेला असतो.

एखाद्या अनोळखी शहरात तुम्ही जेव्हा हाच प्रश्न विचारता तेव्हाचं उत्तर तुमच्या स्मरणात असतं. एखाद्या इमारतीची, एखाद्या हॉटेलची, एखाद्या चौकाची खूण लक्षात ठेवलेली असते. मग एखाद्या गल्लीतून नावाचे फलक पाहात, नाही तर इमारतीचे क्रमांक हुडकत तुम्ही चालता. अभिमन्यू चक्रव्यूहात कसा सापडला असेल त्याची कल्पना करीत अर्धा–पाऊण तास भ्रमन्ती चालू असते. मग ते बिऱ्हाड सापडतं.

तसलं इथं काही नाही याची जाणीव तुम्हाला होते. त्या वाटसरूचे आभार मानायचे राहातात. त्याला त्याची अपेक्षा नसते, परंतु तुमची नवी संस्कृती मनाला तशी सवय करून ठेवते ना! इथपर्यंत सारं ठीक असतं. तुमची फजिती होते ती पुढंच.

नागमोडी, लाल लाल, पायवाटेवरून तुम्ही बरेच दूर जाता. त्यानं सांगितलेल्या खुणा कुठं दिसतंच नाहीत. समोर दुसरीकडे एक वाट फुटलेली असते – चित्रातील वृक्षाला फांदी काढावी तशी. सर्पटोळीसारखी दिसणारी ती वाट तुम्हाला जागच्या जागी थांबवून ठेवते. पुढं तर बारीकसारीक अनेक वाटा दिसू लागतात. सर्वच मळलेल्या, सर्वच नाकासमोरच्या, तुमच्या मागून येऊन तुम्हाला चकविणाऱ्या.

सकाळ असेल तर मन प्रसन्न असतं. मग सारंच वरं वाटतं. सभोवती उंच वाढलेलं पिवळं-करडं गवत, त्यावर दवाचे ओघळणारे बिंदू. मधूनच कोळ्यांनी विणलेल्या जाळ्यांचे षट्कोनी आरसे... हळू हात लावावा. मऊ मऊ ओला आरसपानी स्पर्श. हा आनंद मनाला स्पर्श करून जातो न जातो, तोच काय होतं कुणास ठाऊक! समोरची वाटच कुठं दिसेनाशी होते. करडाचे कुसदार झुबके पोटाशी भाताप्रमाणं दोन्ही बाजूंकडून झुकलेले असतात. त्याखाली ती वाट गुहा करून बसते. आत जायची दारं खाडकन बंद होतात. तिळा उघड म्हणूनही उघडत नाहीत. अशा वेळी सूट-पँट असेल तर

पाहायलाच नको. आणि बहुधा पँटच असते– टेरिलिनची नाहीतर वुलनची ती दोन्ही हातांनी वर करायची, इस्त्री न मोडण्याची दक्षता घ्यायची, पिशवी सांभाळायची, छत्री असेल तर तिला प्राणापलीकडे जपायचं, एक एक पाय पुढं टाकायचा. मयसभेत चालणाऱ्या दुर्योधन-शकुनींप्रमाणं अक्षरश: स्थिती होते की नाही?

ही झाली सकाळच्या प्रहरची गोष्ट. संध्याकाळच्या वेळी तर तुमची वाट चुकवायला आणखी एखादं सुंदरसं कारण घडलेलं असतं.

दूर आभाळातून सप्तरंगाची चाळण खाली झरझरत असते. हिरव्या-पिवळ्या माळावर रंगाची गर्दी झालेली. त्यातच ते रंग कुठंतरी गडप होतात. ते रंग अंगांगातून भरून घ्यायचा तुमचा प्रयत्न असतो. मुलायम रेशमी रंग अंगावरून लपेटावेत, धुंद वातावरणात तृप्तीचे सोनेरी श्वास घ्यावेत अगर, अधिरेपणाचे ठसे वातावरणात ठेवावेत. सर्वच रम्य. मन, मनातील भावुकता, मनाचा हळवेपणा,

सारं सारं हरवलेलं. ही बेहोषी इंद्रियांचा तोल सोडते. पाय तुमचं ऐकतच नाहीत. मग ती वाट तुम्हाला कुठं हुलकावणी देते. कुणास ठाऊक !

खरी गंमत तर पुढंच असते. खुणेचा वृक्ष तुमच्या डोळ्यांसमोर दूर दिसतो. आकाशाच्या निळाईत डेरेदार दिसणारा तो वृक्ष. सभोवार डोंगराची निळी हिरवी चित्रे, एखाद्या सप्तपर्णी वृक्षानं त्या चित्राचा तोल सावरण्यासाठी दुसरीकडे जागा घेतलेली- अशा आसमंतात तो वृक्ष नजरेचं ध्येय होऊन बसतो. वर्षानुवर्षं तो तिथंच उभा असतो. दोन गावांच्या सीमे-वरचा मध्यस्थ होऊन लहानपणी त्या वृक्षाबद्दल अनेक दंतकथा ऐकलेल्या असतात.

तो वृक्ष म्हणजे भुतांचा बंगला! सारी भूतं, देवचार, वेताळ त्यात राहतात. वृक्षावर वटवाघळांप्रमाणे लोंबकळतात. लहानपणी त्या वृक्षाकडे पाहायची छातीच होत नसते. मग कुणाच्या तरी हाताला धरून, मान वर न करता किंवा इकडं तिकडं न बघता वृक्षाला मागं टाकलं की आवरून ठेवलेला श्वास सोडायचा. आता त्याची आठवण होत असते. मनांत हसू

दाटत असतं. आता जाता जाता त्या वृक्षाकडे चक्क नजरेनं पाहून घ्यायची इच्छा होते. प्रत्येक फांदी न् फांदी नजरेखालून जाते. अनेक कल्पनांची वलयं वृक्षाभोवती फेर धरतात. काही क्षण तो वृक्ष दिसतच नाही !

दसरा झाला की गावचा महार रात्री साऱ्या गावाची दृष्ट काढतो. सारी पापं, सारी रोगराई, सारी भुतं–समंध, निघून जावीत म्हणून रात्री देसरूड निघते, वाजत–गाजत, एकान्तात. भयानकता निर्माण करीत घरातली माणसं तो आवाज ऐकतात. घरातला सारा केरकचरा त्या वेळी बाहेर आणून सोडतात. केरसुणी त्याच वेळी बाहेर टाकायची मोकळीक. मग दारं, खिडक्या सारं बंद होऊन चिडी चुप्प!

ती देसरूड मिरवीत मिरवीत निघून साऱ्या गावची भीती या वृक्षाकडे आणून सोडते. दुसऱ्या गावचेही लोक याच सीमेवर येतात. दोन्ही गावांच्या दुःख–क्लेषांचा थर इथं साचतो. त्या वृक्षाला कोहळा मिळतो. त्यावर शेंदूर, जवळ लिंबू, एखाद्या कोंबडयाचं रक्त वगैरे अर्पण केले जाते.

या साऱ्या स्मृती तुमच्या मनात येतात न येतात, तोच त्या वृक्षाला ओलांडून देखील तुम्ही पुढं गेलेले असता.

दुसरी खूण तुमच्यासमोर हजर होते. या मळलेल्या वाटेवर अशा अनेक खुणा आहेत. अनेक दंतकथा या वाटांशी निगडित असतात. तिठ्या तिठ्यावर वेगळ्या कथा, वेगळ्या स्मृती. चिरेखाणीची विहीर–जुनाट वटवृक्षाचे असंख्य पाय आपल्या हातानी चुरत असलेली. इथंही एखादी दंतकथा आजोबाचं रूप घेऊन भेटते. म्हणे पांडव अज्ञातवासात असताना इथंच आलेले असतात. द्रौपदीला स्वयंपाक करायचा असतो. ही द्रौपदी कोकणात आली असेल तर भात शिजविते, देशावर असेल तर पोळ्या करते. काहीही असो. त्यासाठी पाणी हवंच. मग भीम महाराज सेवेसाठी हजर असतात. धर्माची अनुज्ञा घेऊन सेवेकऱ्याप्रमाणे तो पाण्याच्या शोधासाठी जातो. कातळावर पाणी कुठचं मिळणार? विहीर खणली पाहिजे. भीम पराक्रमी हातानं विहीर खणायचं काम सुरू होतं. पाणी मिळेपर्यंत उजाडलेलं असतं. मग अज्ञातवासातील पांडवाना निघायची घाई होते. ते निघाले

नाहीत तर त्यांची प्रतिज्ञा मोडणार. ते निघून जातात. तेव्हापासून ही विहीर इथं तुमचं विश्रांतिस्थान बनते

लहानपणी ऐकलेली ही दंतकथा यावेळी तुमच्या मनाला पटत नाही. पण तरीही तुम्ही विश्रांतीसाठी तिथं टेकता—काही मिनिटं. मग हळूच चोरट्या नजरेनं त्याच्या पायऱ्या मोजता. द्रौपदी कुठं बसली असेल याचा शोध, नाही म्हटलं तरी तुमचे डोळे घेतातच.

वाऱ्याचं थंड मोरपीस अंगावरून हुळहुळलं की तुमच्या पावलांना पुढची ओढ लागते. एखादा महान आम्रवृक्ष आडवा येतो. समूळ खाली कोसळलेला तो वृक्ष स्वतःच्या महात्म्याचं ब्रीद खरं करून दाखविण्यासाठी सदैव आतुर. मागच्या कुठल्याशा चक्रीवादळानं तो कोसळलेला असतो. अनेक वर्षं निघून गेली तरी अजून जिवंत. आंब्याच्या मोसमात त्याला आंबे लगडतात. झाडावर चढायचे श्रम नकोत. जमिनीवर उभे राहा. आंबे काढा. आंबट असले तरी फळांचे राजे ते. तुमच्यासाठी स्वतः खाली आलेले. पण तुमचं मन एका जागेवर कुठचं राहायला? शरीर घामानं निथळलेलं. कपडे अंगाला चिंब चिकटलेले. वाऱ्यानं हट्टानं, विश्रांती घेतलेली. आणि ही वाट कधीच न संपणारी...

त्याच वेळी योगायोगानं वसंत ऋतु असेल तर हरकत नाही. मग तुम्हाला श्रम जाणवणारच नाहीत. कारण काजूच्या| झाडावर पिवळेधम्मक डौलदार काजू लटकताहेत. करवंदाच्या जाळीत द्राक्षांसारखं हिरवं काळं वैभव. आंब्याचा फलसंभार झेलणाऱ्या फांद्या, सुवर्णाला लाजविणारी कर्णफुलं, मनाला भरमात टाकणारी टपोरी जांभळं. पटकुळणीच्या फुलांचे गुच्छदार अनंत हात पुढं सरसावलेले. मोहोरलेल्या रानफुलांचा सुगंध वाऱ्याच्या भर्जरी लहरीतून लहरत असलेला. या साऱ्यांच्या सभोती ढगांच्या केशरी मैहिरपी !

त्यातून नदीचा काठ असेल, तर मायानगरीच बनते. मग ही वाट षोडश-वर्षा नवयुवतीप्रमाणं लचकत-मुरडत जाते. खांद्यावर अमृतकुंभ घेतलेल्या माडांच्या गर्द सावलीतून. दर्भाचे, लव्हाळीचे लवचिक तुरे खोवून. हिरव्या-गार लुसलुशीत हरळीची पायघडी करून पुढं सरकलेली ही वाट किती

मोहमयी, किती नादमयी ! त्या वाटेवरून चालताना शहाळ्याच्या साईच्या मऊमऊ स्मृती दाटून न आल्यासच नवल !

या वाटा सोडून भलतीकडे पाय पडणारच नाहीत. वाट चुकलीच तर भलतेच खडतर प्रसंग पुढं हजर. जाताना काळोख न पडण्याची खबरदारी घ्यावी लागते. काळोख पडला की भुताखेतांच्या ऐकीव गोष्टी अंगावर येऊन कोसळतात. मग कुणीतरी एखादा फिरस्ता वाट चुकत दुसऱ्या गावात रात्ररात्र फिरत राहातो, गोंधळतो, उजाडेपर्यंन्त वाट पाहावी लागते. एखाद्याला मध्येच झोपडी दिसते. तेथेच तो आश्रयाच्या निमित्तानं थांबतो. कारण आत मंद दिवा तेवत असलेला दिसतो. तिथंच एखादी म्हातारी दिसते. स्वत:चं लांबसडक बोट त्या दिवटीवर धरून बसलेली असते. ते बोट जळत असतं आणि ती दात विचकून त्याच्याकडे पाहून हसत असते ! त्या प्रवाशाची घाबरगुंडी उडते. तेथून तो सटकतो. मागं वळून पाहायचा त्याला धीर होत नाही.

–अशा कितीतरी गोष्टी धस्कन अंगावर कोसळतात. दोघा-तिघांत या गोष्टी ऐकायला बऱ्या, पण एकट्या प्रवाशाच्या अंगावर काटा उभा करतात. म्हणून ही वाट कशी लवकर संपेल, काळोखापूर्वी, ही विवंचना. निरोप घेऊन पुन्हा परतायचं म्हणजे मोठी काळजीच. निरोप आनंदाचा असला तर वाट पटकन् आवरती होते. दु:खाचा असला तर रुखरुखीची कुसं सदैव सलत राहातात. वाट संपत नाही. दु:खद गोष्ट घरी जाऊन कशी कळवावी ही चिंता. त्यामुळं तर वाट भयाण वाटते. जिकडे तिकडे चिंतेचीच झुडुपं दिसतात. मग अनेक विचारांच्या आवर्तात वाट संपवावी लागते. नसलेले विचार देखील मनात उत्पन्न करावे लागतात

या मळलेल्या वाटा चुकविण्याची तुमची प्रवृत्ती नसते. एकदा वाट चुकली की पुन्हा ती कधी सापडेल याचा नेम कुणी सांगावा ? आणि ती सापडली तर वेगळाच आनंद उपभोगायला मिळतो. मात्र हा आनंद चाखणारे. फार थोडे वाट चुकल्याचा आनंद कुणाला मिळेल त्याला मिळो, पण मळलेल्या वाटेनं जाण्यात बिनधोकपणा खास आहे. प्रत्येकानं स्वतंत्र वाट चोखाळली तर फार तर त्याला धाडसी म्हणाल, परंतु असं प्रत्येक

जण करू लागला तर तोही अेका वेगळ्या आनंदाला मुकेल. तुमच्या रसिक मनाला ते खास आवडणार नाही. ज्या कुणी प्रथम ही वाट शोधून काढली असेल, त्याची रसिकता मान्य करायला तुमची जरूरी आहे ना ? तुम्हीच जर वेगळी वाट धरली, तर त्याचं कौतुक कोण करणार ? आणि तुमच्या पुढच्या पिढीची वाटही मग वेगळीच असेल मग तुमचंही कौतुक ते करणार नाहीत. काही काळ तरी रूढी मान्य करावी लागते तसं करण्यात कदाचित दुबळेपणा आहे, असं जरी कुणी म्हटलं तरी ते तुम्हाला मान्य होईल. कारण त्यामुळं बेछूटपणाचा, अविचारीपणाचा दोष तरी तुमच्या पदरी येणार नाही.

स्वतंत्र वाट स्वीकारणारे द्रष्टे हवेत, त्या परंपरेने जाणारे त्यांचे शिष्यही हवेत. केवळ छचोरपणानं वेगवेगळ्या वाटा धरणाऱ्यांचा उपयोग क्षणिक असतो. बंडखोरीच्या क्षणिक आनंदापेक्षा त्यात धोक्याची, विवंचनेची रुखरुखच फार. सदैव जाचणारी. नेहमी अस्थिरता निर्माण करणारी. मग त्यातून चिरंतन सुखाची अपेक्षाच तुम्हाला करता येणार नाही, नव्हे का ?

० ० ०

२०७६
२२।०।०४

# ८ : एक इंद्रियातीत रात्र

शब्दांच्या जंगलदार ओळी–
त्यात अंतर्बाह्य भरलेलं विश्व–

त्या विश्वात उमटतात मानवी जीवनाला अधांतरी ठेवणारे मानवाचेच चेहरे. हेमींग्वे .. वाईल्डले .. बुद्ध .. अश्वत्थामा... माधवराव पेशवे... देवदत्त–आराम खुर्चीवर झोकलेला देह हलका हलका होतो. एक इंद्रियातीत रात्र.. काहीशी गूढ . काहीशी बेहोष... समोरचा दिवा दिवा राहत नाही. हातातील पुस्तक पुस्तक राहत नाही सर्वांचेच अस्तित्व हरपते... सर्वांचाच आकार वितळतो... एक उन्मन अनुभव.

हो. नुकतीच खांडेकरांची एक कादंबरी वाचून संपविलीय. गेले तीन तास वेगळंच विश्व पांघरून आहे. इंद्रियांचं जग कुठंतरी स्थिरावलंय सारंच अधांतरी. अंतरिक्षातील कृत्रिम ग्रहगोलाप्रमाणं 'वासुनाका' वाचला होता. त्या विश्वातील चेहरे खायला उठले होते...त्याचवेळी 'अजगर' हातात पडली .. सभोवतालच्या भिंतीनाच कसला तरी कुबट वास येऊ लागला मर्ढेकरांची मी एक मुंगी...तू एक मुंगी जाणवली.

ते सारं जीवन आता ओसरलं आहे. आणि संऽथ संऽथ बर्फाच्या डोंगराप्रमाणं सरकणारं हे उदात्त तत्त्वज्ञानाचं जग. वसुंधरेचं निष्पाप मन..नंदाचं तहानलेलं इंटलेक्च्युअल मन. देवदत्ताची जीवनाचा आकार आणि वेग न

जाणवलेलं अजाण मन. देवदत्ताची आई– हॅम्लेटची आई..

प्रत्येकाचं वेगळं तत्वज्ञान. जीवन-मरणाच्या जाणीवेच्या गर्तेत गोते खाणारं. मी गुदमरून जातो. माझ्याभोवती केंद्रित होतो.

मीच लिहिलेली माझी एक कादंबरी फाडून टाकायला हवी. आता वाचलेली कादंबरी कुठं आणि ही कुठं ?

माझ्या कादंबरीतील वासुकाका. भयंकर जाणवलेले. पण कादंबरीत शब्दांच्या केविलवाण्या धडपडीत पुरे न सापडलेले. कादंबरीतील त्यांच्या मृत्यूनं मी दोन दिवस बेचैन झालो होतो. पण त्यांनी दुसऱ्या कुणालाही चटका लावला नाही. त्यांतील निर्मलेचं दुःख केवळ मी तिला भोगायला लावलं म्हणून मुकाटचानं तिने भोगलं. ते निर्जीव दुःख अपुरं. जीवनाचा काहीही अर्थ न समजलेलं.

मी अगतिक बनतो. डोळे केविलवाणतात. मला हे असं कधीच जमणार नाही का ?

मध्ये एकदा दुर्गाबाईचं व्यासपर्व वाचलं होतं त्यावेळी एक वेगळंच दर्शन घडलं होतं. द्रौपदीनं–अश्वत्थाम्यानं मला व्याकुळ केलं होतं. छळलं होतं. अश्वत्थाम्याच्या डोक्याची खोक ओली होती. चिघळली होती. मी साऱ्या जगाच्याच डोक्याला हात लावून पाहिला. मी नव्हतोच तिथं. रंग होते. क्रूर विश्वाचे...रंगेल आणि रंगेलही, इकडून तिकडून वणवण फिरणारे रंग... विश्वानं पिळून काढलेले.

तसंच ती शरदबाबूंची श्रीकांत. हिमालयाहून उंच झालो होतो मी. आताही तसंच...

शाळेत गेलो होतो. शिकवलं होतं. हातात पेपर्स होते. सभोवार मुलं. त्याच त्याच ओळी... तीच तीच मुलं .. छी ! यात काहीच अर्थ नाही. ही माणसं थिटी आहेत. एक मुलगी पुन्हा पुन्हा माझ्यासमोरून वावरते. एक वेळ केव्हा तरी हिचं सारं स्त्रीत्व—

पण हे जीवन उलटून टाकते एक कविता. अचानक वाचलेली. शब्दांच्या पायघड्यावरून तरंगत गेलो. मुलायमपणे ! कळचा खुडायचा प्रयत्न केला ··आणि माझ्या दोन्ही नुकत्याच लिहिलेल्या कविता फाडून टाकल्या.

कविता लिहिली की वाटतं, सारं विश्व झेलत राहावं. एक लिंबू झेलू बाई. दोनच दिवस. पुन्हा वाटतं, हे अपुरं आहे. निरर्थक आहे. फसवं आहे. केवळ आत्मवंचना. असलं काही लिहू नये. छी ! यापासून काय व्यक्त होतंय ? जे मलाच दोन दिवसाहून जास्त सुखावू शकत नाही–

आणि मी मलाच हसतो. माझ्या पोरकटपणाबद्दल. दोन दिवस कसेतरी मी वेडयासारखे काढले ! माझी कविता सारं जग डोक्यावर घेऊन नाचत आहे. मी वेगळ्या ऐटीत गावातून चालतो. तंद्रीत. लोक बोट दाखवताहेत. हेच ते हेच ते. एक वेळ सारा देश जळला तरी हरकत नाही. पण आमचा शेक्सपीअर... किती वेडगळ कल्पना ?

मी चालत असतो. तिकडे एका दुकानातील तागडीची परडी तसूभरही स्थिरावत नसते. रद्दी फडफडत असते. टरकत असते. बैठ्या डेस्कवरची सोनेरी बाइंडींगची वही उलटत असते. कानावरची लेखणी खाली आलेली असते. साऱ्यांचे व्यवहार चालू असतात. मी ओशाळा होऊन घरी आलेला असतो.

माझ्या पुस्तकासाठी प्रस्तावना मागितलेली असते. त्याच्या हस्तलिखिताची वाट पाहत कितीतरी दिवस निघून गेलेले असतात.

वाटतं, अजून का आली नाही ? माझ्या कविता त्याने फाडून टाकल्या की काय ? मागं एकादां एका कवि मित्राने म्हटल्याचे आठवते. अगदीच भिकार आहेत. तसं झालं का ?

आणि खुळं मन प्रस्तावनेसाठी हपापतं. पण पोस्टांतून पत्र येतं. ‘ लवकर पैसे पाठवा. रेशनला तांदूळ आले आहेत.’

मी कोलमडतो.

प्रस्तावना का येत नाही ? एक दिवस अचानक पत्र येतं. ‘ मी आजारी आहे. बरा झाल्यावर लिहितो.’ म्हणजे अजून वाचल्या नाहीत. हायसं वाटतं. म्हणजे आजचं मरण उद्यावर. पुन्हा हुरहुर...

या हुरहुरीवर तोड काढतो मी !

भावबंधन वाचायला घेतलेलं असतं, गडकऱ्यांच्या भाषेची वीज क्षणभर दीपावते. पण ती क्षणभरच. सारं नाटकी, बेगडी. शब्दांचे खेळ. विरोधी

अर्थाचे डोंगर उभे केलेले. मध्ये खोल दरी उभी करणारे.

शाळेत चहाच्या वेळी कुणी तरी म्हटलेलं आठवतं–' अत्र्यांच्या ' तो मी नव्हेच,' प्रमाणे ' डॉ. लागू ' गाजणार बुवा !'

नाही म्हटलं तरी माझ्यात मत्सराचा पातळसा द्रव निर्माण होतो. मी म्हटले–' हं ' एका बाबतीत. या नाटकामुळं लेखकाला फक्त पैसेच चिकार मिळतील.'

' म्हणजे ?'

' बाकी काही नाही. कुठं सौभद्र ? कुठं भावबंधन ? आणि कुठं हे ?'

मी बोलतो खरा; पण त्यातला अर्थ कुणालाच समजलेला नसतो. सोडावॉटरच्या बाटल्या प्रमाणं सारे फिदफिदतात. चित्रकला शिक्षक निर्बुद्ध कोटया करतात. मी पुन्हा हिरमुसतो. त्यांना कसं पटवून द्यावं हेच समजत नाही. म्हणजे मला जास्त समजतं का त्यांना ?

पुन्हा प्रश्न.

माझ्यात ही भावना निर्माणच का व्हावी ? माझ्यातला सामाजिक ' मी ' नाहीसा का व्हावा ?

या तत्त्वज्ञानात रमायला मला सवड नसते.

' भावबंधन ' वाचताना असंच काहीसं होतं. त्यातील पात्रांपेक्षा प्रत्येक पात्राच्या मुखावर लेखकाची आकृती दिसू लागते. चिकटवलेली.

छे ! लिहायलाच हवं. घनःश्याम हा त्या नाटकातील खलनायकच नाही. लतिका हीच खरी ' खल.' मजकूराचे ढीग मनात तयार होतात. आणि भरतीच्या लाटांप्रमाणं पुन्हा दुमडून कोलमडतात. ती दुमड ओठांसारखी वाटते. त्या कल्पनेतच रमतो.

ओठ···लाटा···ओठांची दुमड···

हे सर्व खोटं ! गडकरी हेच त्या नाटकातील व्हीलन. घनःश्यामसारख्या साध्या माणसाला माणुसकीतून उठविणारे.

बाकी हे लेखक नशीबवान बेटे ! —

मी नुकतंच एक पुस्तक वाचून बाजूला ठेवलं आहे याची जाणीव अंगाभोवती घोटाळू लागते.

माझ्या मनात एक वेगळी कादंबरी निर्माण होते. जगाचा मूळ आक्रोश त्यात उसळतो आहे. सारी मनं वैश्विक पातळीवर तरंगताहेत हा आक्रोश फार मोठा आहे. कुणाच्याही मनाचा थांग लागत नाही. अनेक चेहऱ्याभोवती वेगवेगळी विश्वे. अलग समस्या. एकमेकांत न गुंतणाऱ्या समस्या.

त्या समस्यांच्या प्रवाहाबरोबर मी वाहतोय. गटांगळ्या खातोय. तरीही प्रवाहात मिसळून प्रवाहाशीं समांतर राहतोय.

कादंबरीतील न लिहिलेल्या ओळींची धुंदी पांघरत कंदील बारीक होतो. तेल संपलेलं दिसतं. अंधार जाणवू लागतो. मी खोलीतच आहे, या कल्पनेनं दुखावतो वाचलेल्या कादंबरीतील शेवटची ओळ आठवते.

मोगरा फुलला ऽ मोगरा फुलला–

फुललेल्या कळीचं संपूर्ण समाधान डोळ्यांच्या पापण्यांना सुखावतं. त्या समाधानाला आकार फुटतो. इंद्रियातीत आकार. दिवा पूर्ण विझून काळोख होतो आणि तो आकार खूप मोठा होत जातो. ती रात्र. तो काळोख. पुन्हा दिवस उगवूच नये.

हात पायाखालची शाल ओढून घ्यायचं काम करतात. एक रात्र इंद्रियांच्या पल्याड सरकत असते...

० ० ०

# ९ : झुलता पूल

पूल ... झुलणारा... झुलविणारा... रमणारा ...रमविणारा. मना-मनाचं अंतर तोडणारा. विराटतेला जोडणारा. तुम्ही लक्ष्मणझुला पाहिला आहे ? नाही ? मग शहरापासून दूर या आडगांवात येऊन हा पूल पाहून घ्या. लक्ष्मण झुला पाहिल्याचं समाधान मिळेल तुम्हाला या पुलाच्या मध्य-भागी जाऊन उभे राहा. या पुलावरून एक हिंदोळा घ्या आणि हवेत झुलत राहा. क्षणाक्षणाला हेलकावे घेत तसेच उभे राहा. पाण्यात आपलं रूप न्याहाळत हलणारं-हिंदकळणारं आपलं रूप. हिरवं-निळं रूप. ढगांच्या चित्राच्या गब्दुल प्रतिबिंबाची पांढरी पार्श्वभूमी तुमच्या हेलावत्या रूपाला खुलवून टाकील.

तुम्ही तिथं एकटेच नसणार. तुमच्याबरोबर सभोवतालचे लोभस हिरवे निळे डोंगर नदीत आपले पाय सोडून तुमच्या सोबतीला बसायला आलेले असतील. हे सह्याद्रीचे असंख्य पाय. हा सह्याद्री मोठा विलक्षण रंगेल आहे. एखादी नदी वा मोठा ओढा दिसला की तो हळूच केव्हातरी आपले असंख्य पाय पसरतो आणि या नदीच्या काठी विसाव्याला येऊन बसतो. कोकणात असे सहस्त्र पाय त्याने नदीकाठी पाठविले आहेत.

तर हा सह्याद्री तुमच्या सोबतीला असेल आणि सेवेलाही. आपल्या रूपाच्या दिमाखाची छाप तो तुमच्यावर अशा रीतीने पाडील की तुम्ही कितीही विवंचनेत असा-मन हलकं हलकं झालंच पाहिजे तुमचं. या सह्या-

डीचे डोळेच मोठे विलक्षण. तुमच्या डोळ्यावर हिप्नॉटिझमचा प्रयोग करणारे, तुम्हाला आपल्या नजरेच्या धाकात ठेवणारे, पावलोपावली तुम्हाला खिळवून टाकणारे निळे–सावळे डोळे.

काय सांगत होतो ? हा पूल. यावर एकदा पाय ठेवून पाहा. त्यावरून दुसऱ्या थडीला पार होईपर्यन्त तुमच्या बरोबर आकाश हिंदळत येईल. खालचं पाणी हिंदळेल. डोंगर– झाडे– शेते सारे– सारे काही हिंदोळत–मस्त धुंदीत तुमची साथ करील. त्याच धुंदीत तुम्ही पैलथड गाठाल.

हा पूल बांधण्यापूर्वी सारा गाव नदीनं दुभंगला गेलेला होता. एकमेकांची मनं दुभंगलेली होती. दोन्ही किनाऱ्यावरची हवाही एकमेकांशी भांडायची. एकमेकांचा द्वेष करायची. नैसर्गीक परिस्थितीच मुळी अशी. गावच्या मध्यभागी नदी. पलीकडे गावचा एक भाग डोंगरानी वेढलेला आणि पलीकडे गावाचा दुसरा भाग. मानवनिर्मित सुधारणांचा. गावचा हमरस्ता या अलिकडच्या भागातून जातो. निरनिराळ्या भागाशी या रस्त्यानं संबंध राखलेले आहेत

गाड्या इथून जातात माणसांची वर्दळ या रस्त्यावरून होते. साहजिकच गावातील शाळा–कॉलेज इथेच या ऐलथडीच असणार, पण पैलथडीच्या लोकाना हे पटत नसे. हे पाहवत नसे. पिढ्यान् पिढ्या या दोन भागांचं वाढतं वैर. खरं म्हणजे या वैरानं ऐलथडी येताना नदीतच विरून जावं की नाही ? पण नाही. पावसाळ्यात नदीनं विराट स्वरूप धारण केलेलं असे, माणसं कैदी होऊन अडकून पडत, पण हे वैर मात्र या विराटतेला न जुमानता या नदीला क्षणात पार करून पैलथडी पाय घट्ट रोवून उभं राहील.

मात्र निसर्ग मोठाच खटयाळ. स्वतः दूर राहून मानवाची ही गंमत मिश्किलपणानं पहात असतो. म्हणजे असं पाहा—नदी मधोमध असली तरी दोन्ही भागांचं एकमेकांपासून अडतं. तुझं माझं जमेना म्हणणाऱ्या दोन भावंडाप्रमाणं. ऐलाडच्या लोकांची शेती पैलथडी आहे. माड आहेत, पोफळी आहेत आणि पैलथडीच्या लोकांचे जगरहाटीचे व्यवहार ऐलथडी

आहेत. पैलथडीची मुलं ऐलथडी शिक्षणाला येतात पैलाडचे लोक मुंबईला निघालेल्या मुलाबाळांना डोळे भरून निरोप द्यायला येतात ते ऐलथडीच्या रस्त्यावर. हळदीच्या पावलांनी, पैलथडी प्रवेश करून घरांचे उंबरठे उजवणाऱ्या नवोढा जातात त्या या ऐलथडीच्या रस्त्यानं. मुंबईच्या खुशालीचं हास्य चेहऱ्यावर फुलवायला पोस्टमन जातो तो या ऐलथडीच्या रस्त्यानं.

पावलो पावली या दोन्ही भागातील लोकांचं एकमेकांशिवाय अडतं. तरीही हे लोक एकमेकांचा द्वेष करतात. या हवेनं पिढ्यानपिढ्या हे वैर जतन केलं आहे. मनात पोसलं आहे. रक्ता रक्तातून उतू गेलं आहे. आणि म्हणूनच एकमेकांचं रक्त पाहायला आसुसलेलं आहे वर्षोवर्षी हे चाललं आहे. आणि हे सारं पाहात निसर्ग सभोवार उभा राहिला आहे.

काही शहरी माणसं येतात. स्वतःला शहाणी समजतात. दोन्ही भागातील वैर थांबविण्याचा खुळा प्रयत्न करतात. मुंबईत कमिटी स्थापन करतात. सभा-संमेलन भरवतात. हे वैर थांबल्याचा काही काळ भास होतो खरा. पण ही शहाणी म्हणविणारी माणसं या माणसांतच रमून जातात. त्यातलीच एक बनतात. काही माणसं अशी येतात की, या दोघांच्या वैराचा फायदा घेऊन त्या वैरात आणखी तेल ओततात. गावच्या अस्मितेवर फुंकर मारतात. केवळ स्वतःच्या मोठेपणासाठी.

कोकणच्या लोकांना हा पिढ्यांचा शाप आहे की, त्यांचं डोकं असतं मुंबईला. पाय असतात कोकणातील घरात. या पायाशिवाय डोकं स्थिर राहात नाही व डोक्याशिवाय पाय चालत नाही. 'चरति चरतो भगः' हे उपनिषदी वचन या कोकणी माणसांना लागू पडत नाही. कारण डोक्यापायाच्या गुंतागुंतीत तो थांबतो व थांबतो तो संपतो. हा न्याय म्हणून कोकणी माणूस संपला आहे. जिथं माणूस संपतो तिथे वैर जन्मतं. कारण वैराला माणुसकीचं खत मानवत नाही.

सांगायचं तात्पर्य असं की, डोक्या-पायाच्या या न्यायात या गावची प्रगती थंडावलीय्.

या थंडावलेल्या प्रगतीवरची खपली काढण्याचं काम अलीकडे या झुलत्या पुलानं केलं आहे. दोन थडी-वरील मनं जोडण्याचं काम या पुलानं केलं आहे. पण अजूनही ही मनं पूर्णपणे सांधली गेलेली नाहीत. रक्तात पेटलेली वरं अशीं लवकर विझतील कशी ? मरणान्तानि वैराणि. त्यासाठी मागच्या रक्ताला मरून गेलं पाहिजे. जुन्या पिढ्या नष्ट झाल्या पाहिजेत. नव्या उमलेल्या पाहिजेत.

या पुलानं मला मात्र खूप खूपसं दिलं आहे.

शहरातून मी या आडगावी आलो. मोठं ध्येय उराशीं बाळगून. लहानपणी महात्माजींची हाक ऐकली; त्यानंतर साने गुरुजी, वि. स. खांडेकर, यांच्या ध्येयवादानं रक्त पेटून निघालं.

खेड्याचा रस्ता धरला, पण इथं आल्यावर शहरी संपर्क तुटला. जागतिक बातम्या इथं दोन दिवसानी येऊन थडकतात. जगातले सारे सारे गावासभोवारच्या डोंगराच्या कुडानी बाहेरच्या बाहेरच अडवून ठेवलेले आहेत. समविचारांची माणसं सोबतीला नाहीत. मनाची भूक भागविणारी पुस्तकं नाहीत. चार घटका करमणूक करणारी नाटक सिनेमाची साधनं नाहीत. शाळेत कामात असलं की वेळ चुटकीसारखा संपून जातो. अलीकडे शाळेची कामं फार वाढलीत, पण ती कामं संपली की खेड्यातला एकान्त खायला उठतो. मन बेचैन होतं. शहरातील वाचनालयातून यत्नपूर्वक आणलेली पुस्तकं थोड्याच वेळात वाचून होतात व काम द्या म्हणणाऱ्या राक्षसाप्रमाणं मन निकामी होतं.

अशा वेळी मनाला साथ देतो हा नव्यानं बांधलेला झुलता पूल.

रात्री-बेरात्री, वेळी अवेळी या पुलावर मधोमध उभा राहतो. मी भेसूर काळ्या रात्री,काळ्या पाण्याशी चालणारं काळोखी संगीत ऐकत. पौर्णिमेच्या रात्री रुपेरी रागाशी ताल धरत. सायंकाळच्या वेळी निसर्गाच्या बदलत्या रूपांची असंख्य लहरींवर प्रतिबिंबे निरखत. उंच उसळी घेणाऱ्या मासोळीचे चमकदार खेळ पाहात. 'ऐल तिरावर पैलतिरावर हिरवाळी घेऊन' बसणाऱ्या औदुंबराचं गाणं मनाशी गुंजवीत. तर कधी काव्याच्या पुंजक्यांशी

खेळत. मनात गर्दी करून बेचैन करणाऱ्या संकल्पित लेखनाचे बेत आठवत. असे अनेक दिवस, अनेक रविवार या पुलावर जाऊन थडकले आहेत. झुलत्या पुलाप्रमाणे झुलत फुललेले आहेत. माझ्यातल्या 'मी' ला पुलाखालच्या पाण्यानं बुडविलं आहे.

या पुलाच्या मध्यभागी उभा राहून एक हेलकावा घेतला की क्षणापूर्वीचे मनाचे सारे हलकल्लोळ फुठल्या फुठं विसरुन जातात आणि उरतो तो स्थिरचराच्या पल्याड गेलेल्या — विश्वाला पुरून उरणारा मनाचा एक छोटा थेंब !!

० ० ०

# १० : तंद्रीत असलेलं गाव

सूर्योदयाचे वेळी पहाट कशी आपल्याच तंद्रीत असते. नाही ? अंगावरून काळोख अलगद सरकू लागला तरी ही तंद्री संपलेली नसते. डोकी उंचावून झाडं वर पाहू लागतात ती तंद्रीतच. जांभई देण्याइतपत देखील त्यांना भान नसतं. ओढ्यातील पाण्याचं हासू फेसाळतंय.. सावली सावलीतून झिरपणारं पक्ष्यांचं स्तोत्र कार्तिकातील मधुर मुलायम घंटानादात कंपायमान होतंय.. झाडा-झाडांना वेढतंय. अंगावरून झरतंय, डोंगरा आड कुठंतरी जाऊन विरतंय .. लुसलुशीत हिरव्यात दवाचा भूप राग ओघळतोय. तृप्त वसुंधरेच्या अंगावर सुस्तावून बहरलेली अशा वेळची ही तंद्री...

अशा या तंद्रीत पहुडलेलं एक सुंदर स्वप्नाचं गाव आहे. या गावात जाणारी एक वाट आहे. अगदी वेलीसारखे वळसे घेत जाणारी. कवि

माग्रजांच्या भाषेत सांगायचं म्हणजे ' जणू मल्हारातील तान '

या गावाला नावही फार सुंदर पडलंय. अगदी वेलीं सारखंच नाव. प्रवेश करताना अंग मोहरून जावं असं. शेलाटीशा वाटेनं जाताना पोफळींच्या झावळांतील हिरवीकंच उन्हं अंगावर शालीसारखी पांघरत जावं, काळाच्या पडद्यातून भविष्याचं झिरमिरीत दर्शन व्हावं, तसं या ओढ्याकडे उतरलात की गावाचं दर्शन होतं. तुम्ही प्रवेश करा. पण गाव तुमच्याकडे वळून पाहणार नाही. आपल्याच तंद्रीत.

वास्तविक या गावची तंद्री एकदाच उतरते. दोन डोंगरांच्या दरीत गावकऱ्यांच्या कुकाऱ्यांचा नाद सळसळू लागतो आणि गुरांच्या घुंगुरांच्या टिपेच्या सुरांत माडांची हिरवी झापं थरारतात तेव्हा. मग सुस्तावलेलं गाव थोडी हालचाल करतं. सूर्यकिरणांचे थोडेफार शितोडे अंगावर घेतं. चार चार शितोडेच. माऊलीच्या सड्यावर तप्त उन्हाचा लाव्हारस जरी ओतू लागला तरीही या गावाला हिरव्या उन्हाचेच थोडे थेंब वाट्याला येतात.

मात्र या गावाला मयसभेचा शाप आहे. निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या या गावाला उघड्या नागड्या दारिद्र्याचा वारसा आहे हा वारसा दुसऱ्या कुणाकडूनही मिळालेला नसून त्यानं स्वतःच निर्माण केला आहे. कोर्ट कचेऱ्या करून दमलेलं सावकारी मन व त्या मनानं ठेवलेली व पदोपदी ठेचाळलेली, रक्ताळलेली कुळं. वेदनांचं ओझं घेऊन वाकलेली ही माणसं. वर्षं आली–गेली. दशकं संपली तरीही यांच्या जीवनात कधीच बदल झालेला नाही. नानू गुरवाला देशातील इंग्रज जाऊन दोन तपाहून अधिक काळ लोटल्याचं सोयर–सुतक नाही. सोन्या बखल्याची पोरं त्याच्याच घरात मावत नाहीत एवढ्या उदंडपणानं दरवर्षी निर्माण होताहेत. शितु धनगराचा पोर बोकडं राखताना काशीला घेऊन झाडीत घुसतो तरी सोन्या बखल्याच्या गावी त्याची झळसुध्दा पोचलेली नाही.

देवळात दहाबारा पोरं जमतात. कोपऱ्यातील भारतमातेच्या अंगावर धीट कोळ्यानी माग विणलेला आहे. देवळातील गाभाऱ्यातून निर्माल्याची जांभई बुरसट वातावरण निर्माण करते आहे. बाबल्या गुरव चार शितं दुपारच्या नैवेद्याला आणतो व परत घेऊन जातो. तो परत निघून गेला की पोरांची शाळा सुटते. पुन्हा संध्याकाळी त्याना यावं लागत नाही. कारण मास्तर कांही परत यायचे नसतात.

वर्षोवर्षी गाभाऱ्यातील देव गुरवाकडे शितं मागतो आहे व गुरव त्याला नेऊन देतो आहे. पोरं येताहेत. वर्षभरानं जाताहेत.

कार्तिकातील काकडआरती मात्र चुकत नाही. तसंच बारशीला नारोबाकडून निघणारी पालखीही चुकत नाही. एक दिवस गावाला जरा जाग येते.

चार दुकानं थाटतात. मिरच्यांच्या भज्यांचा खमंग वास सुटतो. रात्रीं पालखीनंतर शंखासुरानं चोरलेल्या ब्रह्मदेवाच्या वेदाना शोधून काढण्याचा प्रयत्न होतो व पहाटे लाकडी हातांचा कृष्ण हातात गदा घेऊन दह्यानं गाडगं फोडतो. त्या गाडग्याच्या पडलेल्या खापऱ्या गोळा करीत भाविकतेनं लोक परततात ते जत्रेतील नाटक मंडळीनी लावलेल्या आख्यानातील प्रसंग मनामध्ये घोळवीत. तो दिवस व त्यापुढील दोन दिवस जरा जागृतीत जातात. मग आलेल्या माहेरवाशिणी परततात व देवळात देवापुढं जमलेलं सारं गोळा करण्याच्या नादात गुरवाचे आठ दिवस मजेत जातात.

ही बारशी आटोपली की दर सोमवारी गावातील चार राखणे हरदास–पुराणिकाच्या पारंपरित कार्यक्रमाला जमतात. देवळाच्या मागच्या कोपऱ्यात मुगाची खमंग उसळ शिजते. गूळाचा कढवलेला चहा किंवा तसाच कुणीतरी इनामदाराचा मुलगा त्या घोळक्यात असला तर त्यानं घरातून नकळत आणलेल्या साखरेची कॉफी हा कार्यक्रम बाहेरच्या निर्जीव खांबासमोर चाललेल्या हरदासाच्या गायनाचे वेळी रंगात आलेला असतो. चहा–उसळीवर ताव मारून झाला की पोरं आरतीला येउन उभी राहतात.

मग गुरव हातात धुपारती घेऊन येतो. आरती संपते. हरदास–पुराणीक घरी परततात किंवा तिथंच कुठंतरी झोपतात.

मग सारं कसं शांत शांत .. पुन्हा गाव आपल्याच तंद्रीत.

गावाला सामाजिक मन असतं ना, तसं सामाजिक मन इथं दिसत नाही.

नाही म्हणायला ग्रामपंचायत नावाची एक निरुपद्रवी संस्था या गावात स्थापन झालीय. ती गावात कोणतं काम करते ते अद्याप कुणाला समजलेलं नाही. एखादा शिकला सवरलेला कुणीतरी येतो. ग्रामपंचायतीवर दाटलेली निर्जीवपणाची खपली काढण्याचा प्रयत्न करतो. त्याना डिवचल्याचं करतो. मग त्या संस्थेला जाग येते. धर्मशाळेच्या एका कोपऱ्यात सभा होते. आवाज चढतो. आणि मग सरपंच नावाचा कुणीतरी इसम मध्येच सभेतून पळून जातो. मग पुन्हा एकदा सारं शांत.

देवळातील शाळेत शिकून बाहेर पडलेली पोरं आता जाणते बाप्ये झालेले असतात. बहुतेकजण मुंबईलाच चाकरमानी म्हणून गेलेले असतात.

गिरणीत अथवा असेच कुठंतरी. सुटीवर केव्हातरी ते गावात येतात. मुंबईत त्यांनी सारे वेगळेंच अनुभव घेतलेले असतात. त्यामुळे त्यांना या गावात विशेष रस नसतो. येतात ते तसेच परत जातात. काही भावनाप्रधान असतात त्यांना गावाची दैन्यावस्था पाहावत नाही. गावासाठी खूप खूप काहीं तरी करावं असं त्यांना मनापासून वाटत असतं. सरपंच नावाच्या माणसासमोर ते आपली योजना मांडतात. गबाळचा पँटीतील सरपंच बावळट चेहरा करून विडीचा नाहीतर चुकून सिगारेटचा झुरका घेतो व हॉटेलातून फुकट घेतलेलं भजं चघळत उत्तर देतो.

'पैसे नाय !'

मग चार दिवस गावचा कायापालट करण्याच्या स्वप्नांची समाप्ती चार दिवसात होते. त्यांची रजा संपलेली असते. रजा वाढवून काहीच फायदा नसतो. तेव्हा तेही बिचारे तरुण आपल्या चाकरीला निघून जातात. मग सरपंच नावाचा तो शहाणा माणूस एक दीर्घ झुरका ओढून नाकातून धूर सोडताना पुन्हा एकदा फिसकारतो--

'मेले व्हरान् गाव सुदरुक इल्ले'

आता बहुतेक सारेच मुंबईला जाऊन राहिलेले आहेत म्हातारी माणसं, बाया, मुलीं अथवा मिसरूड फुटण्यापूर्वीची पोरंच काय ती गावात शिल्लक असतात. जुनी घरं पडत चालली आहेत. नवीन घरं मुंबईत वाढताहेत. डब्यांचे पत्रे डोक्यावर घेऊन कुठं तरी गटाराच्या बाजूला यांची घरं सारवली जाताहेत. मुंबई पुढं पुढं सरकतेय

या गावातील एक एक घर पडून नामशेष होतंय. मातीचा एखादा ढिगारा सभोवारच्या झाडीतून डोकावून पाहू लागला की समजावं--इथं पूर्वी घर होतं. जमिनीच्या तुकड्यासाठी कोर्ट कचेऱ्या झिजवणारे इनामदार गाव सोडून कुठं गेले कुणाला माहीत नाहीं. 'हा इनामदारांचा वाडा' असं केव्हा तरी बोट दाखविण्या-पलिकडे या वाड्याला आता महत्व उरलेलं नाही.

गावातील भुताचा वड हे पाहतोय. सकाळी दव भरलेले अश्रू ढाळतोय. आणि सायंकाळी पाखरांना आणि वाघुळांना आपल्या खांद्यावर उदार

आश्रय देतोय. आपल्या पारंब्यांच्या सहस्त्र हातांनी साऱ्या मुंबईकरांना तो परत बोलावतोय. कुणीही त्याचेकडें पाहण्याच्या वा ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही. तरीही तो केविलवाणी धडपड करतोय. आपले हात पुढं करतोय . . आणखी पुढं. शेकडो सहस्त्र हात. कदाचित त्याचे हे हात अनंतकाळ पुढं पुढं सरकत राहतील—गावची तंद्री संपेपर्यन्त.

वेलीसारखी नागमोडी वाट ओढ्यावरूनच मागं परतत्येय. काकड आरतीचा भूप पहाटेच्या तंद्रीत वातावरण नादमय करतोय. कार्तिकस्नान आटोपून गुरव पंचा नेसून देवळात येतोय. सकाळच्या प्रहरी जमलेली पोरं शेकोटीभोवती बसून मास्तर येण्याची वाट पाहत आहेत; पण ते येऊच नयेत अशी मनोमन प्रार्थनाही करताहेत. गुरांच्या घुंगरात व धनगरांच्या कुकाऱ्यात सारं गाव हेलावतंय. आणि सारं गाव पुन्हा आपल्याच तंद्रीत पहूडतंय...

कदाचित हीं तंद्री कधीहीं भंग पावणार नाही दुसरा इतिहास निर्माण झाला तरीहीं ..

० ० ०

# ११ : चिंधीचे गाणे

**बाहेर** गच्च पावसाचं रान शिवशिवतंय्. तावदानाबाहेर लयीची गर्दी जमून आलीय. खोलीच्या आंत मन भरून आलंय्. खूपशा दिवसात काही लिहीलेलं नाही. याची रुखरुख लागून राहिलीय, मनाला ताण बसला की लिहावंसं वाटतं. आता तसंच वाटतंय. जुन्या स्मृतीचे कोश फाडून शब्दांची फुलपाखरं भिरभिरु लागलीत.

बाहेरच्या पडवीत मुलांची आरडाओरड चाललीय. रवींद्र वसुंधरा मोठाल्या झोकी घेण्यांत दंग आहेत. कुणाचा पाय बाराला लागतो! माझा की तुझा? दादा, तू दोरी ओढ. माझा पाय लागलाऽऽ लागला, तिकडे दिपा, राजन नाटकाची तालिम करताहेत. आईच्या लुगडयाचा पडदा, बाकावर स्टेज. बाकाचा ठेका...स्वतःच बनवलेले संवाद...आवाज एकमेकात मिसळून जाताहेत...

सारा गोंधळ पावसाच्या आवाजानं वेढून टाकलाय. प्रौढ. तटस्थतेनं आराम खुर्चीवर बसून सारं पाहातोय, ऐकतोय. काळोख पडून खूप वेळ झाला आहे. भलत्याच वेळी लिहायची हुक्की आली होती. ही का लिहायची वेळ?

पोरांनी यावेळी गोंगाट करायचाच...मग ती पाखरं झोपतील. आपापल्या आयांच्या कुशीत विसावतील. सारं शान्त होईल. मग त्यावेळीच लिहायला घ्यायचं.

पण आताच लिहून होणार आहे. अगदी पोरांच्या गडबडीतूनही मी जुन्या माळात शिरलो आहे...

आज माझी माझी मुलगी वसुंधरा आहे तेवढाच मी झालो आहे. दिवे लागण...मंद प्रकाशात उजळलेली देवाची खोली. उदबत्तीचा मधुर गंध, धुराची निळी वलयं समईच्या कळयांभोवती वेढा घालताहेत. देव्हाऱ्यावर फळांची माटवी आहे. आंबे...केळी...पोफळीच्या शिपटया... तांबडे तांबडे कवंडळाचे घोस...आंब्याचे हिरवे टाळ...हरिणीची पिवळी फुलं...सारं सारं धुपाच्या वासानं धुंद झालंय.

आजोबा गावाहून नुकतेच परतले आहेत. हातात काठी, भैऱ्या धनगरानं दिलेली, नागाच्या फण्याच्या आकाराची मूठ. खट खट काठी आपटीत आजोबा येताहेत. पाठीवरच्या उपरण्यातून पत्रावळीसाठी चाराची पानं आणलीत त्यांनी. आल्याबरोबर विचारताहेत—

'हात पाय धुतलेत का पोरांनो ?'

'होऽ केव्हाच!'

'परवचा म्हटलीत?'

'होऽ'

'नागाचं स्तोत्र?'

'नाही.'

'ते कोण म्हणणार?'

आम्ही हिरमुसलेले, एकमेकांची तोंडं पहात उभे.. कसंबसं म्हणून संपवितो. आजोनं पोफळीच्या पोवल्यातून तांबडया तांदुळाचं पातळ-जाडसं आटवल वाढून ठेवलेलं असतं.. त्यावर तूप, पिवळं पिवळं मेतकूट, कुडयाच्या पानावर बाजूला मीठ, आवळयाचं लोणचं... साऱ्यांनी वाटोळं कडं करून बसायचं. एकमेकांच्या हातावर एकमेकांचे घास ठेवायचे—

माझं बघ कित्ती गोऽड !

माझंच गोड.

आटवल भुरकण्याचा समारंभ मोठाच गोड. त्यावेळीही गलका. पण मोठया माणसांची भलतीच घाई. आमचं लवकर कसं होईल याकडे साऱ्यांचं

लक्ष. आम्हाला दटावतात. आटपा रे लवकर– मग माजघरांत सर्वांची अंथरूणं जवळ जवळ सभोती भाताच्या मुडयांच्या भिंती–

झोपा रे आता–

पण झोप कसली येते ?

आजोबांपाशी गोष्टीचा लकडा.

तीच तीच गोष्ट, तेच तेच शब्द, तीच तीच वाक्यं. पण अवीट. "मेघडंबरी पोरे क्या रोती है" या मेघंडबरी शब्दाला वेगळाच नाद, वेगळाच स्पर्श. चित्रं उमविण्याचं, प्रतिमा कोरण्याचं महान् सामर्थ्य. आकाश दिसायचं, विजा दिसायच्या, घन गंभीर आवाज ऐकू यायचा सभोताली वृक्षाचं भलं मोठं जंगल मोठमोठे वृक्ष, त्यात भल्या मोठ्या ढोली .. निळी-गहिरी पोकळी–त्यात कुठल्याशा पक्षांची पिलं हे पक्षी कोण कुणास ठाऊक ! ना गाव ना नाव, पण ते पक्षी डोळ्यापुढं उडताहेत. पावसाची शिरशिरी उमटतेय्–गोष्टीला रंग चढला आहे. ध्रुपदाचं वाक्य आलंय–

" मेघडंबरी पोरे क्यो रोती है ?'

गोष्टी संपून गेल्यात-आम्हाला ऐकायचं आहे आजीचं गाणं चिंधीचं गाणं-

आजीची वाट पहात अंगाची मुटकुळी करून पडलेले. आपली अंथरुणं सोडून दुसऱ्यांच्या अंथरुणावर गोळा झालेले. माजघरात ढंच काळोख, स्वयंपाक घरात समईचे दिवे .. सर्वांची जेवणे अद्याप आटोपली नाहीत. आम्ही वाट पाहून कंटाळलेले, पण मोठी माणसे गप्पांच्या भरात–

' बाबा टुंबऱ्यानं भात किती घातलंन् ?"

काहीतरी उत्तर.

" विठाबाची कबुलायत नव्यानं लिहून घ्यायला हवी–"

" त्या मांगरासमोरची वई कोणी मोडली ?"

" या गांधीनं सारा भ्रष्टाकार माजवलाय. "

" सुतानं स्वराज्य मिळवतायत् लेकाचे–"

स्वयंपाक घरांतून अनेकांचे उद्धार होत असलेले–आम्ही कंटाळलेले

पण जागं राहायची जिद्द कायम. एकमेकांना चिमटे. मग ओरड... आजीची वाट पहात. ती मुळी वेळच काढायची. आम्ही झोपलो का पाहा-

यची शेण सारवणं-देवघरात पोतेरं—किती वेळ ! ढणढणणारी चिमणी घर खायला उठे... पुन्हा मुलांत गडबड. आणि कुणाच्या तरी पाठीत धक्का... पण चिन्धीचं गाणं हवं आहे–

गोड गोड गाणं. आजीनं म्हटलेलं–

मध्ये आजी झोपली आहे. तिच्या पायात पाय घालून आम्ही... गाणं चालू आहे... कापरा गोड आवाज... दिवा बारीक केलेला...

" द्रौपदीसि बंधू सा जे ऽ ना-रा-य-ण.'

रक्ताची जखम-फाटलेला शालू-रक्ताळलेलं बोट... आम्ही शहारतो.

बहीण भावंडांच्या प्रेमाचे अनंत संस्कार आमच्या मनात बिंबत. द्रौपदीच्या प्रेमानं आमच्या डोळ्यांवरची झापड उडून जायची. माजघरातील काळोखात लख्ख प्रकाश .. मोठा वाडा रत्नजडित झोपाळा...कृष्णाची सावळी, मिश्किल हसणारी मूर्ती–द्रौपदीची भयचकित मुद्रा... सारं वातावरण बदललेलं,

आम्ही आमचे श्वास रोखून धरलेले...

गाणं चालू आहे.

" भरजरी गं पितांबर दिला फाडुनी ऽ- "

कानात आवाजाची फुलपाखरं भिरभिरताहेत. रात्र फुलारलेली. झोप पुढं पुढं सरकलेली. आकाशातल्या रंगी मेघाप्रमाणं...सारं काळोखी वातावरण आजीच्या मंद सुरांनी ओथंबलेलं. मग केव्हा तरी डोळ्यांना पेंगूळ... आणि एकदम पहाटेच्या नारोबाच्या काकडआरतीचा नगारा ऐकू येई... चिंधीचं गाणं–

त्याच सुरांनी, त्याच चालीनं मनात कायमचं घर केलं आहे. सारं काही तेच आहे...

काळ मात्र सरकलेला आहे ..

आता घरांत जेवणाचं टेबल मांडलेलं आहे...चिमण्या डबड्यांची जागा सुंदर निळ्या बल्बनी घेतली आहे रेडिओवर कुमार गंधर्वांच्या सुरांना पंख फुटले आहेत. प्रत्येक मुलाला स्वतंत्र पलंग... मच्छरदाणी...

बाहेर पावसाचं थैमान. आत ऊबदार हवा.

कुमार गंधर्वांचा आवाज भराला आला आहे.

आजीची अखेरची वेळ आठवते आहे–

आम्ही सारे एका अंथरुणावर झोपलेलो ... आमच्यामध्ये आजी .. गाणं म्हणून आम्हाला झोपवते आहे...

द्रौपदीसि बंधू साजे ना-रा-य-ण!

आजी एकदम गप्प होते. आम्ही चाळवतो. आम्ही हाक मारतो. आजी, म्हण ना गाणं. म्हण...आम्हाला झोप येत नाही ... दिवा मोठा करतो आम्ही

आजोबा येतात. सारी माणसं जमतात. गलका होतो. आजोबा म्हणतात

' सुहासिनी गेली बिचारी. पुण्यवान शब्द अश्रूंत भिजलेले.

आजी, गाणं म्हण. म्हण ना गं ऽऽ–

आम्हाला कुणीतरी गप्प करतं. काय झालं काहीच समजत नाही.

आजी गाणं म्हणायला देवाघरी गेली आहे... कुणी तरी म्हणतं. सारं वातावरण एकदम बदलतं.

चिन्धीचं गाणं–

मंद सुरातलं. लोभसवाणं वातावरण निर्माण करणारं. बाल्य काळ मोहरविणारं.

चिन्धीचं गाणं–

वय झालं तरी मन तेच आहे. शरीराच्या रोमारोमांत ते गाणं भिनून गेलं आहे, या गाण्याच्या स्मृतीचा एक एक संस्कार घेऊन काळ सरकला आहे, पण पिढ्यापिढ्यांचं अंतर मिटवायला लावणारं ते गाणं मनाच्या भिंतीवर झिलई देऊन जोपर्यंत आहे तोपर्यन्त काळ थबकल्यासारखा वाटणार आहे. कितीही वृध्दत्व आलं तरी...

बाहेर पाऊस थांबला असावा.

कुमार गंधर्वांनी द्रुतलयीला आरंभ केला आहे.

त्या लयीतच या चिंधीच्या गाण्याचे सूर लगडले असल्याचा भास होतोय. या धुंदीतच मी लिहिणार आहे !

० ० ०

# १२ : गाईमागून धावणारं पोर

त्या पोराविषयी मी बोलतो आहे.

थांबा, आधी माझे पूर्ण ऐकून घ्या. मग बोला, भाष्य करा. टीका करा काहीही करा. तो तुमचा अधिकार आहे. प्रत्येक गोष्टीवर भाष्य करण्याची तुमची खोड मला मान्य आहे. तेव्हा ते पोर --- ते शेंबडं आहे. म्हणजे त्याचे वय काय असेल त्याची तुम्हाला कल्पना आली असेलच! ते धावतंय कोणामागून ? एका सामान्य गायीमागून. सामान्य गाय केव्हा केव्हा मस्ती करते संधी मिळाली म्हणजे ! अशा सामान्य दिसणाऱ्या गायीच मस्ती करण्यासाठी संधी शोधण्याचा प्रयत्न करतात. कोणती गाय मारकी आहे, कोणती साळसूद दिसते हे प्रथम दर्शनी ओळखता येतं, पण ते अनुमान खरं निघेलच असं नाही. ही गाय तशी दिसण्यात खूप साधी दिसतेय, पण मी तिला पूर्ण ओळखून आहे. तिनं संधीचा फायदा घेतला आहे. तिला माहित आहे की या पोराला आपण सहज दमवू शकू. कारण ते पोर अगतिक आहे —— एका हाताने ते चड्डी सावरतं आहे, एका हातात काठी म्हणजे एक शिरपूट घेतलं आहे, गाय पुढं पळते आहे. रस्त्यावर तिठा आला की हुलकावणी देते आहे आणि त्या पोराला तर तिला परतवून अन्य गुरांत नेऊन सोडायचं आहे. किती तरी वेळ हा असा खेळ चालला आहे. कदाचित घरातील मोठ्या माणसांनी ही याचेवर कामगिरी सोपविली असेल. नव्हे तशीच वस्तुस्थिती असावी. कारण

अशा गोष्टी पोरांवर सोपविणं हे मोठ्यांनाच जमतं. कारण मोठ्यांनी कधी असली यामं करायची असतात? त्यांचा अमूल्य वेळ खर्च होईल ना? तेव्हा घरातल्या सर्वांनी ही कामगिरी अनुक्रमे व पायरी पायरीने आपल्याहून लहान असणाऱ्यावर सोपविली असणार आणि या बिचाऱ्या पोराहून कुणी लहान नसेल. आणि असलंच तर पाळण्यात असेल. त्यामुळे त्याच्यावरच ही कामगिरी येऊन पडली असणार हेच जास्त शक्य आहे.

मी पाहतो आहे, ते पोर शेवटी मोठ्यानं रडू लागलं. अगदी अगतिक होऊन. ती गाय काही त्याचं रडं ऐकत नाही.

त्या पोरानं कितीही आकांत केला म्हणून गाय थांबणार थोडीच ! म्हणजे त्याचं रडणं अगदी निरर्थक आहे. पण आपण निरर्थक रडतो आहोत हे त्या पोराला कसे समजणार ? बरं त्याच्या मदतीला कुणी जाणार आहे का ?

मला ते दिसत आहे. पण मी जाऊ शकत नाही. एक तर गायीला अडविण्यासाठी दुसऱ्या मार्गानं पुढे गेले पाहिजे. तेवढी ताकद मला नाही. दुसरं म्हणजे मी जो इथं तिठ्यावर उभा आहे तो केवळ एका गाडीतून उतरून दुसरी गाडी पकडण्यासाठी. माझ्याबरोबर उतरलेले आणखी दोघे आहेत. ते अधिकारी वर्गापैकी असावेत असं एकंदरीत त्यांच्या कपड्यां-वरून वाटतं. ते काही या गायीला अडवू शकत नाहीत. म्हणजे जो तो आपल्या व्यापात आहे. कुणालाच वेळ नाही. फक्त समोर जे दिसत आहे ते कळतं. पाहण्यापलीकडे आमच्यापैकी कुणीच काही करू शकत नाही. आमच्या व्यतिरिक्त अन्य चिटपाखरू देखील त्या रस्त्यावर नाही. तेव्हा त्या गायीला अडवायचं काम त्या पोरालाच करावं लागणार. त्याला ते झेपत नाही. म्हणजे ते काम त्याच्या कुवतीपलीकडचे आहे. म्हणून अगतिक-तेनं ते रडत आहे. आम्ही सर्वच त्या पोराची कीव करीत आहोत. आता तुम्ही त्या प्रसंगावर भाष्य करीत बसणार आहात. अगदी खुशाल करा. आहे ही वस्तुस्थिती मी तुम्हाला सांगितली. आता तुमचं भाष्य मला ऐकून घेणं भाग आहे. कारण मला पुढची गाडी मिळेपर्यन्त वेळ घालवायचा

आहे मधून मधून त्या पोराकडें, मधून मधून त्या गायीकडं पाहायचं आहे तुम्ही म्हणाल, त्या पोरानं रडावं कशाला ?

पुन्हा मागे परतावं. गायींला सोडून द्यावी. नाद सोडावा. पण ते पोर जिद्दीचे आहे. त्यावर तुमच्यातलाच एखादा मल्लिनाथ म्हणेल,–

मी, तू, तो, ती सारे त्या पोरासारखेच नाही का ? सारी सर्वनामेच त्या पोरासारखी आहेत. कबूल ! हे सांगायला तुमच्यातील मल्लिनाथ जागा व्हायला नको. अहो सरळ साधी गोष्ट आहे ही !

सकाळी उठल्यापासून तों रात्री झोपेपर्यन्त तुम्ही अगदी जिद्दीनं कामाला लागता. प्रत्येक वेळीं कंटाळून कसं चालेल ? काम तडीला न्यायचा प्रयत्न करता पण तो प्रयत्नच अपुरा पडतो. सर्व इलाज करून झाले आणि इच्छित गोष्ट हाती लागली नाही की आपल्या कर्माची-दैवाची ढाल तुम्ही पुढं करताय ना ? गायीच्या व त्या पोराच्या रूपानं तुमच्या समोर जगातलं भीषण नाट्य उभं राहात नाही का ?

एखादा शास्त्रज्ञ विशिष्ट शोध लागण्यासाठीच जन्माला येतो. एखाद्या संताचा अवतार विशिष्ट युगासाठी व्हावा लागतो. पण तुम्हा आम्हा सामान्यांच्या वाट्याला येतं काय ? प्रत्येक गोष्ट लादलेली. अंगावर आली म्हणून स्वीकारायची. एवढेच काय, जन्मच मुळी आमच्यावर लादला गेला आहे, अशा भावनेने आम्ही कामाला लागणार. मग लादलेलं काम पूर्ण नाही झालं तर आपल्या कर्माला रडणार नाही तर काय करणार ? आम्हीं सामान्य माणसं या पोरासारखीच आहोत. परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलेली. दैवाला दोष देत देत राहाणारी आणि निसर्ग दूर राहून तुम्हाला खदाखदा हासत तुमच्या साऱ्या हालचाली पाहातच राहतो. निसर्गाला गाडी गाठायचीच असते. त्याला का थांबायला भरपूर वेळ आहे ?

पण तुमच्यासाठी न थांबताही तो तुम्हाला पूर्ण ओळखून असतो. तुमची मनातून कीव करीत.

आरशात चंद्र पाहून समाधान पावणारा राम काय, अथवा चंद्रावर पाय ठेऊन समाधान मानणारा त्या रामाचा वंशज काय, अणूतून ब्रह्मांड

पाहणारे पूर्वीचे ऋषी मुनी अथवा ब्रह्मांडाचं अणूत रूपांतर करणारे आजचे शास्त्रज्ञ, या साऱ्यांचे खेळ, हा निसर्ग थोडावेळ थांबून पाहतो. क्षणभर कौतुक करतो, पुढं जातो, त्याला सृष्टीच्या बाळांवर, त्यांच्या लीलांवर जास्त कौतुक करायला वेळ नाही. त्याला यावर कोणतंही भाष्य करायला आवडत नाही. आपल्या लाखो डोळ्यांनी तो तुमच्याकडे पाहून फार तर एवढंच म्हणेल, 'आपण काय करतोय ते त्या पामराला समजत नाही, देवा, त्यांना क्षमा कर!' अर्थात् देवानं तुम्हाला क्षमा केली की नाही हेही पाहायला त्याला वेळ नाही. आता तुमच्यातल्या दुसऱ्या भाष्यकारानं त्या पोरावर भाष्य करण्याऐवजी गायीवर भाष्य करावं! त्याला माझी काही हरकत नाही. पण निसर्ग हा स्वतःच त्या गायीसारखा आहे. स्वतः न दमता तुम्हालाच दमविणारा. तुमच्यात जिद्द निर्माण करण्यासाठी तुम्हाला मिसळायला लावणारा. आणि तुम्ही अगतिक होऊन रडकुंडीला परतलांत तर एका डोळ्यानं तिरकं पाहात तुम्हाला हुलकावणी देणारा!

० ० ०

२००८
२२००८
[illegible]

REFBK-0022774

विद्याधर भागवत यांची पुस्तके :

**सागरवेला :** (काव्य)

**विचारदर्शन :** (शालेय)

**तिळफुलें :** (ललित निबंध)

**तू अभुक्त आहेस :** (कादंबरी)

❖

**आगामी :**

**गौरी :** (कादंबरी)

**विठ्ठलाची बायको :** (कथा)

**चाफा :** (काव्य)

# नवी अभिनव प्रकाशने

१. वेदनेचा वेध : (समीक्षा) प्रा. म. गं नातू — १५-००
कै. चिं. त्र्यं. खानोलकरांच्या कादंबऱ्यांची वेधक चिकित्सा.

२. आणखी एक द्रोणाचार्य : (नाटक) उमाकांत ठोमरे — ७-००
डॉ. शंकर शेष यांच्या खळबळजनक नाटकाचा अनुवाद.

३. उद्रेक : (कथा) योगीराज वाघमारे — ८-००
दलित कथेचा प्रभावी हुंकार.

४. सारा जन्म उन्हात : (कादंबरी) द. स. काकडे — १२-००
खेड्यातील दलित स्त्रीच्या दुःखाची कहाणी.

५. प्रतिबिंब : (आठवणी) विमल वी. गोडबोले — १५-००
एका कलासक्त जीवनाची वाटचाल.

६. मी तरुणी : (ललित लेख) सौ. छाया दातार — १६-००
आधुनिक तरुण स्त्रीच्या विविधांगी जीवनाचा मागोवा.

७. हॉन डॅट : (कादंबरी) लक्ष्मण लोंढे — २५-००
व्हिएतनामच्या स्वातंत्र्य लढ्याची यशोगाथा.

८. आंबेडकरी जलसे : (फार्स) भीमराव करडक — १२-००
आंबेडकरी चळवळीवरील खुमासदार फार्स.

९. खलाटी : (ललित लेख) म. ना. पाटील — ७-००
कुलाबा जिल्ह्यातील लोकजीवनाचे मनोज्ञ दर्शन

१० शेषसमीक्षा : (टीकालेख) शेष (सं. त्र्यं. सुळे) — २०-००
सृजनशील मार्क्सवादी समीक्षा.

११ तिळफुले : (ललित निबंध) विद्याधर भागवत — ७-००
काव्यमय शैलीतील चिंतनपर ललित निबंध.

अभिनव प्रकाशन, दादर, मुंबई ४०० ०१४.